
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ७३२८
१२५०



REFBK-0007480
REFBK-0007480

बा. भ. बोरकर

# आनंदभैरवी

अनुक्रम 29939
क्रमांक 9384 3/11/56
REFBK-0007480
ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 7480
2-50

३॥ रु.

बा. भ. बोरकर

: प्रकाशक :
पां. रा. ढमढेरे, एम्. ए.
३३२ सदाशिव पेठ,
पुणें २.

पहिली आवृत्ति
नोव्हेंबर १९५०

❀ यापुढील आवृत्तींचे सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ❀

: मुद्रक :
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस लि.,
४०।४१, वेलस्ले रोड, पुणें १.

आमचे अहमदाबादचे
कवि मित्र
**उमाशंकर जोशी**
आणि
**वसंत हेबळे**
यांस—

माझ्या भावसंगीताची
ही भैरवीहि असेल,
पण मी ती आनंदाने
गायलेलो आहे.

ग. ह. पाटील

१ – १० – ५०

स्थळप्रत.
२११३१ काव्य
१३४८ दि: ३०।११।५८

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| छेड अशीच शरीर सतार | १ |
| तुझ्याजवळी | ३ |
| खंजीर हे मारीत जा | ४ |
| डोळे तुझे बदामी | ५ |
| माझी बेगम | ६ |
| माझ्यापरी | ७ |
| नवल | ८ |
| रसवंतीस | ९ |
| काळास | १० |
| आगीचें पांखरूं | ११ |
| रात निळी रात निळी | १२ |
| तव नयनाचे दल हालले ग | १३ |
| खाईतला स्वर्ग | १४ |
| रुमडाला सुम आले ग | १५ |
| समजावणी | १७ |
| पाण्याला ओढ लागली थोर | १९ |
| आणखीन् काय | २० |
| विफलतेंतील सफलता | २१ |
| सोळा वर्षांनंतर | २२ |
| हरिच्या स्मरभुवनीं | २३ |
| त्रास | २५ |
| रमणी आणि घरणी | २७ |

| | |
|---|---|
| श्वास भरवतांना | २९ |
| निजल्यावर | ३० |
| सायुज्य | ३१ |
| साबरमतीच्या कांठीं | ३३ |
| माझी पूजा | ३५ |
| स्वातंत्र्याचा दीपोत्सव | ३७ |
| भंग्यांच्या घरीं | ३९ |
| हांसत लावा वज्रटिळा | ४० |
| आमार जीबनइ आमार बानी | ४२ |
| असले हें फळ केविं तपाला | ४४ |
| भगवती स्वतंत्रतेस | ४६ |
| अंतरीच्या अश्रुंनीं | ४७ |
| तिरंगी झेंड्यास गोव्याचें निमंत्रण | ४८ |
| स्वातंत्र्यलक्ष्मीस | ५० |
| श्रावण–दर्शन | ५१ |
| आकाशमाउलीस | ५३ |
| सागरास | ५४ |
| माडाचे भावगीत | ५७ |
| एक सायंचित्र | ५९ |
| खिडक्यांवर वाजे वारा | ६० |
| माझ्या गोव्याच्या भूमींत | ६२ |
| करी मला वज्रदेही | ६५ |
| मुखवट्यास | ६६ |
| इमानी कुत्र्यास | ६८ |
| कानफाट्याचा फटका | ६९ |

घेऊं लक्ष्मीला घरीं ७०
धन नाहीं हें पाणी ७२
काळ बोले ७३
खवीस ७५
पंढरीस वाजे घंटा ७६
ताज ७७
अमृत खेंचुनि आणूं भूवर ७८
समुद्रकांठच्या चांदरातीस ८०
शिव ते, द्या त्यांस पिंडावळ ८१
वृद्ध होऊं तेव्हां ८२
तूं ८३
यमदर्शन ८४
माझ्या मताची 'माउ' ली ८८
हिमालयाची हांक ९०
चिरंतनाचा ध्यास ९१
आळंदीची वाट ९३
मला आपुलें म्हणावे ९४
दे अंती तव गोडी ९५
वास्तवता मज न दिसे ९६
उःशाप ९८
जीवन त्यांना कळलें हो ९९
अजून थोडें सोस मना १००
ये संध्ये जा कथुनी १०१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थलांतर.
अनुक्र 29739 वि काव्य
क्रमांक 9348 नों. दि 3/8/77/45
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 6840

## छेड अशीच शरीरसतार

तूं छेड अशीच शरीरसतार
कधिं करित मृदुल कधिं कठिण प्रहार

भैरव छेडित कधिं मज जागव
जाळित कधिं मज दीपक आळव
काढ जोगिचे कधिं करुणारव
पीळित तार न् तार

पडद्यांपडद्यांतून दिडदा दिड
ताडित माझी आवड नावड
जडाजडाची ओलांडित तड
उलगड स्वरशृंगार

— आनंद भैरवी —

करांगुलीचें तुझिया ताडन
मृदु–मादक कधिं दाहक दारुण
तेणें परि मम स्फुंदन क्रंदन
स्रवतें जीवनसार

तव किमयेच्या कनकरवांनीं
व्यथेंत रसरत्नांच्या खाणी
तुझ्या दयेचें त्यांतुनि पाणी
निथळे अपरंपार

तव स्पर्शाविण जाई जो क्षण
तो मजला मरणाहुनि दारुण
कृतान्तसें मम वंध्य रितेंपण
ओकित ये अंधार

करिं ही तनु तव करिंची कांडी
विश्रांतीला दे तव मांडी
नश्वर पिंडांतुनि ब्रह्मांडीं
करीं अखंड विहार

मदिय निबंधनिं रे, तव मुक्ति
विरक्तींत मम तव अनुरक्ति
विलोपनीं मम तव संतृप्ति
घेई ध्वन्याकार

सरूं पाहतां हिची टवटवी
सद्गति दे हिज तुझ्या गौरवीं
मृत्यूची आनंद-भैरवी
झणकारित ने पार

मुंबई २४–११–४८

करांगुळींचें तुझिया ताडन
मृदु-मादक कधिं दाहक दारुण
तेणें परि मम स्फुंदन क्रंदन
स्रवतें जीवनसार

तव किमयेच्या कनकरवांनीं
व्यथेंत रसरत्नांच्या खाणी
तुझ्या दयेचें त्यांतुनि पाणी
निथळे अपरंपार

तव स्पर्शाविण जाई जो क्षण
तो मजला मरणाहुनि दारुण
कृतान्तसें मम वंध्य रितेंपण
ओकित ये अंधार

करिं ही तनु तव करिंची कांडी
विश्रांतीला दे तव मांडी
नश्वर पिंडांतुनि ब्रह्मांडीं
करीं अखंड विहार

मद्दिय निबंधनिं रे, तव मुक्ति
विरक्तींत मम तव अनुरक्ति
विलोपनीं मम तव संतृप्ति
घेई ध्वन्याकार

सरूं पाहतां हिची टवटवी
सद्गति दे हिज तुझ्या गौरवीं
मृत्यूची आनंद-भैरवी
झणकारित ने पार

मुंबई २४-११-४८

## तुझ्याजवळी

तुझ्याजवळी माझिया मनीं जागते विरक्ति
डोळ्यांआड होतां मात्र पुन्हां ओढिते आसक्ति

तुझ्याजवळी पूर्वींची अकस्मात उठे तेढ
दुरावतां तुझी मूर्ती परी अंतरांत ओढ

तुझ्याजवळी जिवाचे उलतात घावघाव
एकान्तांत जिव्हारींचे फुलतात भावभाव

तुझ्याजवळी कळेना कसा होतों मी कठोर
परी आठवानें तुझ्या होतों पोराहुनी पोर

कोण अशी सांग तूं गे सहवासीं छेडणारी
आणि वेड्या स्वप्नभासीं दीसरात वेढणारी.

दादर

## खंजीर हे मारीत जा !

उद्धटां पेटीत या खंजीर हे मारीत जा
लाळघोट्या लोचटांना अन् खडे चारीत जा
खंजीर हे मारीत जा

अल्लडे, चोहींकडे जा हुन्दडोनी केवडे
कर्वती झाडीत ही गर्दी दुरी सारीत जा
खंजीर हे मारीत जा

वीजशी तेजाळुनी अभ्रें भ्रमाचीं जाळुनी
स्वर्गवेड्या लोचनांची व्यग्रता वारीत जा
खंजीर हे मारीत जा

विक्रमा दे प्रेरणा, आव्हान दे गे यौवना
काष्ठपाषाणांतुनी चैतन्य संचारीत जा
खंजीर हे मारीत जा

पंचभूतांच्या परी नाना विलासीं फांकुनी
आधिव्याधी अन् जरामृत्यूस संहारीत जा
खंजीर हे मारीत जा

देवदैत्यां जागवीं अन् मांड गे हृन्मंथना
कोष रत्नांचे झणीं तारीत उद्धारीत जा
खंजीर हे मारीत जा

मुक्त मी संजीवनी ! विश्रांतिची हो रागिणी
आणि माझ्या अंतरींची तार झंकारीत जा
खंजीर हे मारीत जा

मुंबई ६–२–४७

## डोळे तुझे बदामी

डोळे तुझे बदामी देती मला सलामी
त्यानेंच हा असा मी झालों गडे निकामी

लागे न चित्त धामीं लागे न चित्त कामीं
मोठे लबाड लुच्चे डोळे तुझे बदामी

जखमी करून जीवा हंसती वरून नामी
भरितात मीठ ऐसें डोळे तुझे बदामी

बोली मिठास त्यांची कावा तरी गनीमी
भुलवून मारणारे डोळे तुझे बदामी

होती क्षणांत भोळे होती क्षणीं वहीमी
छळिती परोपरींनीं डोळे तुझे बदामी

जरि हाल चालती हे दे नित्य ही गुलामी
सुलतान मोंगली हे डोळे तुझे बदामी

मी धुंद मोर कामी फुलवून रोमरोमीं
हे नाटकी इमानी डोळे तुझे बदामी

मुंबई २९-९-४७

## माझी बेगम

माझी बेगम आली-प्यारी-माझी बेगम आली.
मस्त मोंगली विलास सगळे उधळित ही भंवतालीं

डोळ्यांतुनि वाळ्याचें अत्तर हांसत-हांसत जाळी
केश रेशमी, गाल मखमली, अधरिं शराबी लाली

वचनीं बुलबुल, गायनिं कोकिळ, कवनीं पिक कुरवळी
न्हाली ही शृंगाररसानें प्रतिभालंकृति ल्याली.

सुमधुर स्वप्नें, दिव्य भविष्यें फुलवित गालीं, भालीं
श्वासें जाळी धूप, कटाक्षें उरांत खंजिर घाली

आणि तत्क्षणीं घाव चुंबुनी होई रंगरसेली
हांसत, नाचत ये चंदेरी माझी गझल-कवाली
अन् रक्ताची मैफल उडवी हृदयीं, रंगमहालीं.

दादर २४-५-४१

## माझ्यापरी—

अंतरीं माझ्यापरी गे मुक्त तूं, संन्यस्त तूं
जीवनीं माझ्यापरी संयुक्त तूं बंदिस्त तूं

वृत्तिनें माझ्यापरी स्नेहाळ तूं स्वच्छंद तूं
मुक्त हस्तें वाटिसी माझ्यापरी आनंद तूं

घालिसी माझ्यापरी नाना मिषें गे वाद तूं
हांसुनी माझ्यापरी अन् आणिसी संवाद तूं

वाणिनें माझ्यापरी गे लाघवी अन् गोड तूं
वर्तनें माझ्यापरी गे लाविसी अन् ओढ तूं

संयमें माझ्यापरी गे निर्मिसी सौंदर्य तूं
आणि त्यानें संयमाला आणिसी माधुर्य तूं

वारिसी माझ्यापरी अन् जीवनींचें द्वैत तूं
भावनांचें साधिसी माझ्यापरी अद्वैत तूं

होमुनि माझ्यापरी होसी जगाचें दिव्य तूं
होउनी माझ्यापरी गासी विधीचें काव्य तूं

मुंबई २९-९-४७

## नवल

अंधारिं उभा मी बघत नभा
गे, तटस्थ वर नक्षत्र-सभा

रोमांचांतुनि असुर प्रगटले
आक्रंदुनि मज तुडवूं झटले
त्यांस खर वळें पदीं चिरडिलें
जणुं मत्त गजें धरिलें दर्भा

दैवाचा अजि खर शर सुटला
विंधुनि कर तव उरिं मम शिरला
तपोबलें परि शर वर ठरला
सखि, दुर्लभ तूं मज हो सुलभा

क्रुद्ध हिंस्त्र पशु विनम्र झाले
व्याळ विषारी गरळ विसरले
खड्याखड्यांतुनि हेम निघालें
कोळशांस फुटल्या लाल जिभा

जिवाजिवांचें रक्त मिसळलें
म्हणुनि असें हें नवल वर्तलें
अद्‌भुत त्यांतुनि दिव्य हांसलें
उकलुनि मंगल जीवनगर्भा

कां मग आतां वृथाच कण्हणें ?
बघ वर झालें गगन ठेंगणें
न्याहाळुनि पाहण्याकारणें
चिन्मय अद्वय अपुली प्रतिभा

मडगांव 	२१-६-४१

## रसवंतीस—

उजळ नितळ स्वच्छंद मासळी स्फटिकजळांत जशी
तशी निरंजन रूपीं मजला दिसशिल सांग कशी ?

प्रसाधनाचीं चतुर साधनें मींच दिलीं तुजला
लावण्यानें नटवुनि त्यां तूं धुंदविलें मजला !

अभिमानें तुज मिरवियलें जनिं मीं त्या धुंदपणीं
धुंदपणीं—हेः निज विभवाच्या मादक अंधपणीं !

ज्योत्स्नाराति ! तुजभंवतिं विजेची करुनी आरास
रसलोलुप या हृदया दिधला स्वकरें वनवास.

अष्टांगाची दावुनि अपुल्या शाश्वत सुंदरता
मळलेल्या या हृदया नयनां दे गे सार्थकता.

जलवंतीपरि ये रसवंती होउनि निरुपाधी
उःशापानें तार आपुला जिवलग अपराधी.

✓ अनसूयेपरि ये ये सदये होउनियां विरती
उद्धर जे विधिहरिहर माझ्या हृदयीं तळमळती.

मुंबई २७-३-४६

## कालास

या जुळ्या कळ्यांतुनि खुडणें तुज जरि एक
ने मलाच आधीं, हुंगुनि घे वा फेंक

पण नकोच ! सखिला असह्य तें व्हायाचें
अन् फुलण्याआधिंच रूप तिचें जायाचें !

त्याहुनी अशी ही असतांनाच सुरेख
लावण्यें तिचिया शिखा तुझी तूं रेख

मरणाहुनि दुःसह कळ ती मी साहीन
सौंदर्य तिचें स्थिरचरांत अन् पाहीन

जळतांना गाउनि दीपक होइन धन्य
मल्हार आळवुनि पाडिन वा पर्जन्य

लावण्य सखिचें उपसुनि हृदयामधुनी
तिज करिन अमर मी अनंत अंतःकरणीं !

दुर्दैवाविलासितें परी जरी कधिं काळीं
दिसणार दुपारीं अवस आंधळी काळी

प्रीतिचा जरी सखि-हृदयिं अंत होणार
मज ठार करुनियां भेद तिचें जिव्हार

–घण पडतां हीरक पाडिल द्युतिचा सेक
ती होइल अधिकच प्रेरक आणि सुरेख !

ग्रंथकमत.
२९९३९ ... कविता
९३४८ ... ३०१२२।४४

## आगीचें पांखरूं

आगीचें पांखरूं । खुळे हें । आगीचें पांखरूं
कशास त्याला कुसुमकरांनीं उगाच बघसी धरूं ?

पंख तयाचे इंद्रधनूचे
लांवुनीच गे पहावयाचे
पळभरहि न तें स्थिरावयाचें वायूचें लेकरूं

सोन्याचा जरि तुझा पिंजरा
माणिकमोत्यांचा जरि चारा
राख तयांची माखुनि जाइल, नको तया आवरूं

पेटवितें तें उडुनी भुवनें
आणि गाउनी उजळी गगनें
चंचलता दाहकता त्याची नको तरी विस्मरूं

रक्त स्वतःचें पिउनी जगणें
त्या धुंदीनें गाणें, उडणें
अशा जिण्याच्या जिवास धरुनी नको सुखा अंतरूं

मुंबई, २५-१२-४१

## रात निळी रात निळी—

रात निळी रात निळी
त्यांत सखे ! तूं जवळी
धवल विहगयुगुल जळीं
भंवतिं लहर सोनसळी

सजल हरित गार धरा
शिरशिर भिडते अधरा
वीज तुझ्या अन् पदरा
तांबुस हिरवी पिवळी

पोटांतुन गंध सुटे
ओठांतुन ध्वनि उमटे
तेजानें मन विनटे
निटिलिं फुले दीपकळी

गात्रांतुन विश्व पिऊं
नेत्रांतुन विश्व स्रवूं
मिसळूं रसराग नऊ
रात्रीच्या पुष्पदळीं

मुंबई ११-७-४७

## तव नयनाचें दल हललें ग

तव नयनाचें दल हललें ग !
पानावरच्या दंवबिंदूपरि
त्रिभुवन हें डळमळलें ग !

तारे गळले, वारे ढळले
दिग्गज पंचाननसे वळले
गिरि ढासळले, सुर कोसळले
ऋषि, मुनि, योगी चळले ग !

ऋतुचक्राचे आंस उडाले
आकाशांतुनि शब्द निघाले
" आवर आवर अपुले भाले
मीन जळीं तळमळले ग ! "

हृदयीं माझ्या चकमक झडली,
नजर तुझी धरणीला जडली
दो हृदयांची किमया घडली
पुनरपि जग सांवरलें ग !

मुंबई २८-११-४७

## खाईंतला स्वर्ग

मखमली या अंतरीं तूं नेत्ररत्नें खोविलीं
तीं निखाऱ्यांसारखीं पेटावयाला लागलीं

तूं गडे अंगा रुमाला लाविला जो केवडा
त्यांतुनी फुत्कारती गे लक्ष नागांच्या फडा

थंड तूं पाणी जुईचें जें दिलें चांदींतुनी
मस्तकीं त्याचीच झाली मस्त वेडी वारुणी

गार तूं हस्तांबुजांनीं गाल हे गोंजारिले
गंधकाचें चूर्ण आतां त्यांतुनी वाटे जळे

घालितां तांबूल तोंडीं बोट हें तूं दंशिलें
आज त्याच्या गे विषानें स्वास्थ्य सारें भ्रंशिलें

बाहुंची नी पुष्पमाला जी गळां तूं घातली
घात घाली तीच आतां तांत जीवा वाटली

आणि तूं जी पुष्पमुद्रा ठेविली ओठांवरी
तप्तमुद्रा होउनी ती डाग देई अंतरीं

जाणसी तूं शेज कां ही अग्निशय्या जाहली
रेखिसी जीं आज स्वप्नें काल मीं तीं पाहिलीं

राहुनी खाईंत या मी स्वर्ग येथें पाहतों
कालकूटीं पोहतांही अमृतानें नाहतों

मुंबई २९-२-४८

## रुमडाला सुम आलें ग

तुला मला उमगला जिव्हाळा
जन्मांचा पट फिटला ग

अन् शब्दांचा प्रपंच सगळा
कमळांसम हा मिटला ग

तुला पहातां पहांट वाटे
  ओती कुरणीं मोतीं ग

प्रभेस मिळती कृतार्थ होती
  अभिलाषांच्या ज्योती ग

देखियल्याविण तव तनु मजला
  बाग फुलांची उघडी ग

खुडिल्याविण त्यां मन्मन झालें
  अन् सोन्याची परडी ग

मन तव चंद्रापरि करि सोबत
  जेथें संचित नेतें ग

चराचरांतुन प्रेमळपण तव
  हांसत जवळी येतें ग

तुझ्या लोचनीं पावन सरिता
  क्रांती आणिक शांती ग

मदन अंतरीं जळला, पडल्या
  अस्थी प्रयागतीर्थीं ग

आलिंगन-चुंबनाविना हें
  मीलन अपुलें झालें ग

पहा, पहा, परसांत हरीच्या
  रुमडाला सुम आलें ग

मुंबई — २१-२-४८

## समजावणी

उगीच कां ग उदास । घेउनी । इंद्रवनींचा ध्यास ?
येति न जरि करिं तेथिल सुमनें अलभ्य तरि न सुवास
साजणी, उगीच कां ग उदास ?

त्याच वनांतिल कस्तुरिहरिणी
ती अपुली जननी ही धरणी
धुंदपणें नीलारुण कुरणीं
निज नाभींतिल भासांमागुन मुरडत करी प्रवास

स्तन्य तिचें लुचुनी रात्रंदिन
तिजपरि करुं त्रिभुवन क्रीडांगण
सेवित नवनव किरणांचें तृण
निज देहांतिल स्वर्गरसानें गोड मुखीं करुं घांस

इथल्या रत्नीं तेथिल ज्योती
इथल्या नयनीं तेथिल मोती
प्रेम तेथलें इथें कपोतीं
भंगुरतेमधिं इथें तेथल्या सुंदरतेचा वास

इथल्या हृदयीं तेथिल प्रीती
व्यथेंत इथल्या तेथिल गीति
येथिल मीलनि तेथिल तृप्ति
इथल्या ज्वानीमधें तेथला घुमत फुले मधुमास

स्वप्नें तिथलीं इथल्या रात्रीं
तिथली विद्युत् इथल्या गात्रीं
मधु तिथला इथल्या मुखपात्रीं
मिठींत इथल्या गंधर्वांच्या मिथुनांचा इतिहास

सुगंध तिथले येथिल सद्गुण
मोहन तिथलें येथिल जीवन
मुक्ति तेथली येथिल अर्पण
संजीवन तेथलें येथला रसनिर्भर सहवास

उणें करूं जग क्रीडुनि आपण
क्षणहि न दवडूं आनंदाविण
सहज हुपूं अंतीं हें कुंपण
हांस, सखे, चल स्वर्ग खुला करुं जोंवर इथें निवास

अहमदाबाद — १२-७-४८

## पाण्याला ओढ लागली थोर

नाजुक वर चवथीची कोर
पाण्याला ओढ लागली थोर

पानापानांत अंबिवनीं
निळ्या जळाचिया अंगणीं
पाउलें सांजसाजणी
पुसट तव लाविति वेध कठोर.

पान्यावाणी कायसें जळीं
तुझ्या बोटांतली मासळी
धरूं बघतां पळली तळीं
तुझ्यासम तीही चंचळ पोर

कोकिळा गेलिस देउन सूर
फळफुलां रसगंधांचा पूर
मला परि मंद निळी हुरहूर
धुरापरि जरि आशांस फुलोर

हांसली पसय कुळागर-कोनीं
केळिवर सोनफुलें पाहोनी
गंधगुजगीत तिचे ऐकोनी
गुणगुणे निर्झर रानकिशोर

दशादिशा चुंबन दिनरजनींचें
वाढवी स्पंदन मिथुन जनांचें
करी मन घरटें लावण्याचें
जलदसें जरि तें काळेंभोर

बोरी· १९३७

## आणखीन् काय ?

विचारिसी परोपरी मला 'आणखीन् काय ?'
शब्द मावळती सारे माझा होई निरुपाय

बोलायाचें खूप खूप मनीं येतां मी योजून
तुला पहातां पहातां जातों परी विसरून

कांचनाचीं निरांजनें तसे तुझे गडे डोळे
त्यांत कापरासारखा माझा जीव जळे पोळे

खट्याळ त्या ओठांतून तोंच गुलाबाचें पाणी
गार गार सुगंधांत माझे पंचप्राण न्हाणी

क्षणोक्षणीं ओलांडितों असें जीवन-मरण
जन्मतांना मरतांना कुणा शब्दांचें स्मरण ?

असें मुकाट्यानें वाटे तुला आजन्म पहावें
उदकांत विस्तवांत न्हात जळत रहावें

आणि तूंहि विचारावें मला 'आणखीन् काय ?'
शब्दवैभव असून माझा व्हावा निरुपाय.

मुंबई २३-२-२८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 6860

## विफलतेंतील सफलता !

असंख्य रे तव दयिता रमणा ! कसें कळावें तुला ?
लपुनि करावें प्रेम असा हा स्वभाव अमुचा खुळा !

खुळी मीहि रे, दुरून बघतें धुंद तुझे लोचन
सतेज गगनें त्यांत चिंबती सकाळ सायंतन

वेध कशाचा जडे तयांना, जाति कुठें पाउलें ?
कशामुळें तुडविल्यावरीही दिसती न तुला फुलें ?

जीव वेंचुनी फुलें पसरिलीं तुझिया मार्गावर
पाय तयांवर पडतां गमलें, थांबशील क्षणभर

वळुनी बघशिल आगें मागें विचल होउन मन
यांचसाठीं लपुनियां भटकलें मी तुझिया मागुन

होतें गमलें, पाहिन माझें रूप तुझ्या लोचनीं
आणि नयन तव जडवुनि घेईन हृदयाच्या कोंदणीं

कथिलें जीवा तृषार्त होउनि, धरिशिल तूं ओंजळ
करीन हलका ऊर खोलुनी हें तटणारें जळ

गोड गोड याहुनी किती तरी भरलें होतें मनीं
मुशाफिरा ! गेलास फुलांसह हृदयहि हें तुडवुनी !

तरिही राहिन मूक, पुढें जा, घे तेजोदर्शन
इथेंच मी तव पदमुद्रांचें करीन रे पूजन !

सफलतेंत विफलता शेवटीं दिसेल का पण तुला ?
विफलतेंत सफलता पाहणें स्वभाव अमुचा खुळा !

कॅंपे १४-३-४२

## सोळा वर्षांनंतर

वर्षें सोळा झालीं गोळा तुझिया डोळां भावमयी!
तयासवें आंसवें तुझीं तीं पाझरलीं माझ्या हृदयीं

झांकियल्या प्रणयाची लाली गालिं तुझ्या सखि झळझळली
द्राहें तिचिया घर्मजलें या भाळावरुनी ओघळलीं

संकल्पांचे घुमट वाटले मजला क्षणभर थरथरले
परी दृष्टिंतिल तुझ्या स्मितानें क्षणांत ते सखि सांवरले

" यश घेउनियां या लवलाहीं " वदलिस अस्फुट कांहिं असें
गमलें मजला जीवन सारें नटलें पुनरपि वीरसें

रमे! यापुढें उमा मला तूं दिव्य मंत्रसे शब्द तुझे
स्मरतां त्यातें लोचन माझे कडकडत्या भिडतात विजे

मिटतां ते अन् गळतां गात्रें हृदय गडे अवचित उघडे
आणि अश्रुंचें तुझ्या मंगले! मौक्तिकदर्शन मजसि घडे

निजकांतीनें सांत्वन करिती विरघळतां जेव्हां विरहीं
अन् ताऱ्यांपरि पथ दावुनियां सांवरिती लढतां प्रलयीं

मुंबई २८–७–४६

## हरिच्या स्मरभुवनीं

सोड सखि ! येतें काकुळती
कुंजवनींचे रव रात्रंदिन व्याकुळ मज करिती

आर्जवें करिशिल सांग किती ?
कळतें मजला, दिसतें सगळें; परि नच अन्य गती.

दूर कर केशरची वाटी
चांदण्यांत मी बुडवुनि काढिन अंगाची कांती

ललाटीं माझ्या स्वैरपणा
आवळुनी हे केश बांधितां होइल काय उणा ?

रेशमी शालु नको चोळी
मधुचंद्रोदयिं वसेन लेवुनि छायांची जाळी

रिते मज येथिल मणिमोतीं
दाटति आटति अश्रु चार पळ जैसे गणगोतीं

अमोलिक जरि ते तुज गमती
कालिंदीचे तुषार निळसर घे अंगावरती

नगांचे काढ झणीं ओझें
या भारानें दुरावेल मज अंतिम घर माझें

जेधवां हृदयीं धरिल हरी
सालंकृत तनुभागा मुकतिल परमामृतलहरी

घालिसी लोभ वृथा इथला
पाय सखे जरि रुतला येथें प्राण तिथें रतला

वराया तनु येवो नवरा
भरोत अनलानें, लवणानें पितरांच्या नजरा

येथले पाश आतां तुटले
देहसुखा जे भुललें जग त्या मन माझें विटलें

भुले जो केवळ देहसुखा
स्पर्शे का तो शकेल उजकूं हृदयांतील अलका ?

असा तुज काय रुचेल सखा ?
जीव हिरावुनि गेला त्याला म्हणशिल का परका ?

हिणव, म्हण अगणित त्या दयिता
अगणित सुमनें फुलवि म्हणुनि का हीन गडे सविता ?

नको मज ठेवूं गुंतवुनी
लग्नघटीनें ठरेन जारिण क्रूर न हो सजणी.

देइं सखि ! देइं कान जरा
प्रवालपाशांपरि रव येती न्याया मजासि घरा

लाजरें जळ कां तव नयनीं ?
चल, पळ जाऊं, सखे ! विसावूं हरिच्या स्मरभुवनीं

कॅंपे ४-११-४१

त्रीस—

आवर जळ नयनींचें रमणी
नातरि होइल प्रळय त्रिभुवनीं

चुकुनी पडला थेंब एक जर
पिचेल धरणी, खचेल अंबर
हताश होतिल ब्रह्मा-हरि-हर
पडेल स्वर्गहि कोसळुनी

तुवां भोगिल्या प्रेमयातना
दुःसह दारुण प्रसववेदना
यज्ञीं होमुनि रूपयौवना
दिव्य विश्व सृजिलें हंसुनी

आशेसम तूं कन्या सुगुणी
चंद्रकलेसम प्रेमळ भगिनी
प्रिया उषेसम सुखसंजीवनि
गंगेहुनि वत्सल जननी

म्हणुनि उरा तव फुटतां पान्हा
देवहि लोभुनि झाला तान्हा
विसरुनि अपुला पोरकेपणा
चिरंजीव झाला पिउनी

तोच पिउनि परि आम्ही मानव
कृतघ्नतेनें झालों दानव
रक्तस्नानीं गणुनी गौरव
हाय ! तुडविलें तुज चरणीं

स्नावें थकलों, थिजले अवयव
शुभगीती करिती करुणारव
तुझ्या दयेचा होउनि आठव
मन अनुतापें ये जळुनी

कितिदां केली तुझी वंचना
दिल्या मदभरें अमित यातना
अंत न जाणे परि तव करुणा
धांवत येशी कळवळुनी

प्रभुनें रचिलें दूध तुझ्या स्तनिं
अम्हीं मात्र गे तोय लोचनीं
कठिण समयिं या परि हें विसरुनि
'क्षमस्व मे' मांगल्यखनी

कॆंपे ६-९-४२

## रमणी आणि धरणी

प्रमत्त तुजपरि सखि ! ही धरणी
धीट देखणी तरणी ताठी
असल्या मादक सौंदर्याचा
मोह माझिया मना मराठी
हिचें तटतटे यौवन येथें
तुटूं पहाती हिरव्या गांठी
तुझ्यापरी ही अधीर सजणे,
प्रखर माझिया स्पर्शासाठीं !

चमके बघ कुदळीचें पातें
आहे ना मम अशीच दृष्टी ?
जी पडतां तुजवरती वरिवरि
केलिस मजवर रतिसुखवृष्टी
नादिं लागतां तुझ्या म्हणाले
लोक कपाळीं चढवुनि आंठी,
' पोर फांकडी फिरवुनि याला
फेंकिल जणुं कळकाची काठी ! '
आजहि म्हणतिल, ' फोड काढुनी
घेईल अंतीं हातीं माती ! '
लाखेसम या लाल मातिनें
भरिन भांग तव माझ्या हातीं !
या कुदळीच्या घावासरशीं
चमक उठे बघ कशि सोन्याची
चमकुनि हटली मागें जरि ती
हौस मला हिज लाजविण्याची
लाख सुखें मज दिसती दडलीं
या असल्या मस्तीच्या पोटीं
म्हणुनी खणतो उन्हांत असल्या
पितों चांदणें तुझिया ओठीं
मी प्रीतीचा पाइक न सखे !
केवळ रतिसुखभोगासाठीं
वा भूमीचा मालक केवळ
पोट कसें तरि भरण्यासाठीं !

केंवे १५-९-४१

## घांस भरवतांना

'दीपका' ! मांडिलें तुला सोनियावें ताट
घडविला जडविला चंदनाचा पाट

घरदार प्रकाशानें भरीं काठोकांठ
दारीं आलेल्याची सोपी करूं पायवाट

घातली ताईने तुला रंगांची रांगोळी
पित्यानें रेखिल्या गोड भविष्याच्या ओळी

थांशिली समई मी ही केली तेलवात
दह्यांत हा कालविला जिरेसाळ भात

गा रे राघू, गा ग मैने, बाळाच्या या ओळी
मुखीं तुमच्याही घालूं दुधांतली पोळी

कुतू, काऊ, चिऊ, माऊ, या रे सारे या रे
सांडलेलीं शितें गोड उचलुनी घ्या रे

गुणी माझा बाळ कसा मटामटा जेवी
आयुष्यानें थीर करीं माये ! कुलदेवी !

कॅंपे २६-७-४४

## निजल्यावर—

आतांच लागला कुठें राजसास डोळा
चोरपावलांनीं सारे सानथोर चाला

घरीं बाओी झाले फार ‘ सरले ’ ‘ पोलारे ’
त्यांत माझ्या लाडक्याची झोप जणूं वारें

खोडकर वाऱ्या, नको वाहूं सोसाट्यानं
पारव्याची झोंप याची कवड्याचे कान

पावसा, येणार तरी ये रे मुकाट्यानें
झाडपेड मोडूं नको तोडूं नको पानें

उगी उगी ‘ घुगी, ’ नको बाळा भेडसावूं
‘ काक्या ’ ओरडत नको उडूनियां जाऊं

काजव्या, रे पोरा नको पेकाट पाजळूं
डोळ्यांच्या पाकळ्या बाळ लागेल रे चोळूं

उंद्रामामा ! करूं नको गडबड हूं चूं
इंद्रचंद्रा घरीं बाळा फुलें दे रे वेचूं

सरले, पोलारे–पायांच्या बोटांतले मुलींनीं घालावयाचे दागिने. काक्या–कावळा. घुगी–घुबड.

कॅंपे २६–७–४४

## सायुज्य

लाविला मुला मज किती लळा
तुझ्यामुळें तुजहुनिहि मी खुळा !

तुझें बोलणें, तुझें चालणें
तुझें नाचणें, तुझे हांसणें

त्याहुनि न दुजें चतुर देखणें
त्रिभुवनांत शोधुान मिळे मला

उरलें आतां लेखन, वाचन
परिभ्रमण अन् तत्त्वविवेचन
तुझ्यांत रमलें मन रात्रंदिन
मज तुजविण न दुजा विरंगुळा

तुझ्या सुखें हें चित्त सुखावे
तुझ्या सहज लीलांत विसावे
त्वन्मय मी आजला स्वभावें
रे, तुझ्या व्यथेच्या मला कळा

तुझ्या दृष्टितुन मज जग नूतन
अनुभूतींतुन नित नवजीवन
प्रतिक्षणीं आनंद चिरंतन
दर्शनें स्पर्शनें दे उजळा

अनुतापाविण पाप वितळलें
गृहतांपातुन संचित फळलें
श्रेयहि प्रेयांतुनि आकळलें
उगवला कलंकांतून मळा

प्रभु ! तूं येउनि माझ्या पोटीं
कुळें तारिलीं शाण्णव कोटी
असें निज इथें चिमण्या ओठीं
सायुज्य दिलें तूं अजामिळा !

कॅंपे १९४४

२११३९
१३४८

## साबरमतीच्या कांठीं

कर बांधाबांध गडे
संपली ग ताटातुटी
मांडूं पुन्हा नवी चूल
विणूं आतां घरकूल

काढ तुझी लगबग
बांध केंस, माळ फूल,
आवडती साडी चोळी
लाव टिकली बाटोळी

तुपाची ग फुलवात
लाव अंगारा मुलांना
लाव भावें देवापुढें
आतां संपलें सांकडें

कर आई-वडिलांना
त्यांच्या आशीर्वादें असा
तीन वार नमस्कार
आज सांधला संसार

तुझा उधळिला जो मी
त्याच्यामुळेंच तथाचा
गडे संसार देखणा
सरे आज उणेपणा

खवळल्या समुद्रांत
मायमाउलीनें आज
जरी घातली मी उडी
मला उचलिलें तडी

येथें आहे महात्म्याच्या
आहे शांती आहे तृप्ती
पुण्याईचें तपोवन
सर्व मुक्तीचें साधन

येथें पावनतीर्थांत
साऱ्या आसमंतीं आहे
रमे सारसांची जोडी
गोव्यामधलीच गोडी

मोरपारव्यांची येथें दीसरात आहे दाटी
खारी, माकडांचीं पिलें धीट 'दीपका'च्या साठीं

'चंद्रनाथ' 'भारती'ला दुधा कांहीं नाहीं उणें
तुझ्या माझ्यासाठीं आहे वाळवंटांत चांदणें

महात्म्याच्या पावलांनीं येथें धूळ झाली बुका
हवेमध्यें श्वास त्याचे धूप यायचा न तुका

तुझी भक्ती, तुझा त्याग तुझें तप आलें फळा
माझ्या भविष्याचा मार्ग मला झाला ग मोकळा

महात्म्याच्या संगतीचा मला लाभला एकान्त
सहा महिन्यांत झाला खरा स्वर्गाचा दृष्टांत

त्यानें उचलिला भार सारी निरसली चिंता
त्याच्या पावलांच्या जळीं सोडूं आसक्ति अहंता

पुण्यक्षेत्रीं राहून या त्याचें स्वरूप आठवूं
साऱ्या गात्रांतून त्याला उरीं जीवनीं सांठवूं

गाऊं त्याच्या ओव्या गाणीं शेंकड्यांनीं, सहस्रांनीं
त्याच्या पावलांच्या खुणा उमटवूं पानोपानीं

चरक्याच्या तालावर रचूं त्याचें रामायण
जीवनांत पदोपदीं करूं त्याचें पारायण

आण यादस्तीनें परी एक येतांना नारळ
आणि बांध पदराला चार गोव्याचे तांदुळ

त्यांत आहे आपुल्याला जीवनाची फलश्रुति
पितरांची, वंशजांची आम्हां सर्वांचीच मुक्ति

मुंबई २३-७-४८

## माझी पूजा

हे मित्रांनो ! भाग्य न माझें तुमच्यासम जळण्याचें
मुख मंगल निज मातृदेविचें युग युग पाजळण्याचें

तुम्हि श्रद्धेच्या ज्योति
तुम्हि धैर्याच्या मूर्ति
नमन तुम्हांला त्रिवार माझें, पुढच्या सर्व पिढ्यांचें

भाग्य न माझें तुम्हांपरी जन ! मुकेपणें जळण्याचें
अखंड अपुल्या निश्वासांनीं परिसर दरवळण्याचें

धूप तुम्ही उदवत्त्या
हरण सदैव असत्या
स्मरण आपुलें श्वसन अखंडित संजीवन हृदयांचें

अन् भगिनींनो ! भाग्य न माझें तुमच्यासम फुलण्याचें
सर्व समर्पुनि निर्माल्याचें मंगल धन व्हायाचें

तुम्हि रसपुष्पें शोभा
सौंदर्याची आभा
स्मृतींत तुमच्या सत्य उद्यांचें स्वप्न होउनी नाचे

अन् वडिलांनो ! भाग्य न माझें तुमच्यासम झिजण्याचें
नित्य उगाळित जीवनकाष्टें शामकता देण्याचें

तुम्हि चंदन, हित, शांति
आश्वासन, विश्रांति
पुण्योदक नयनांतिल तुमच्या पाणी अभिषेकाचें

भाग्य न माझें अन् श्रमिकांनो ! तुम्हांपरी खपण्याचें
पीक काढुनी ताट भराया षड्रस नैवेद्याचें

तुम्ही फळें सेवेचीं
उदंड आरोग्याचीं
तुमच्या बीजांमधें युगंधर सारे वृक्ष उद्यांचे

महापूजनीं स्थान न कळुनी या दुबळ्या जीवाचें
रितेपणीं निज निश्चल बसलों मुख पाहत देवाचें

हललें हृदयीं कांहीं
निनादले स्वर देहीं
घंटा झालों, स्रवलों स्तोत्रें, यश तुम्हां सर्वांचें

२४-७-४९

## स्वातंत्र्याचा दीपोत्सव

घाम आपुल्या शिरीं । बापुजी । घाव आपल्या उरीं ?
स्वातंत्र्याची अशा दिवाळी कशी करूं साजरी

दुभंग झाली वास्तुदेवता
दुभंग झाली मायाममता

भावांच्या घावांतुन निघती नव्या विषाच्या झरी

भाउभाउ वेगळे निघाले
खडे जाहले होउनि भाले

कसे दाखवूं दिवे तयांना, पायस रांधूं घरीं ?

चक्र इथें अन् चंद्रिम तिकडे
द्वैत बघुनि हें तुटे आंतडें

हें रक्ताचें वैर वाकडें, गमे जिव्हारीं सुरी

अशोक येथें अकबर तेथें
येतिल का हो स्मरुनी नातें

चंद्र सुदर्शन मिळवित मिरवित सबाह्य अभ्यंतरीं

क्षमा करा मन झालें शंकित
आणि व्यथेनें चित्त कलंकित

हंसा पिताजी, भविष्य मजला पाहूं द्या अंबरीं

घाम पिळा, आंवढा गिळा हो
फुलतिल हृदिंच्या शिळा शिळा हो

दिवे लागतिल व्यास वाल्मिकी गातिल उच्च स्वरीं

पापें अमुचीं विसरा क्षणभर
प्रसन्नतेची घाला पाखर

तुमच्या आनंदांतच अमुची प्रभो दिवाळी खरी

मुंबई ३०-७-४७

## भंग्यांच्या घरीं

हरि आला हो, हरि आला हो
भंग्याघरिं हरि आला हो
हरिजन झालों सर्वार्थांनीं सगळा पंक गळाला हो

झाडा रस्ते, झाडा अंगण
न्हाउनि या हो, लावा चंदन
दसरा समजुनि दिवस आजचा आनंदानें पाळा हो

घरधनिणींनो घेउनि बाळां
लावा कुंकुमटिळक कपाळां
सौभाग्याची आज दिवाळी रंगीं फुगडी घाला हो

या, पोरांनो धमाल उडवा
टाळ ढोलकीं मृदंग वडवा
हरिनामाचा लेजिम खेळत स्वर भिडवा आभाळा हो

छळ गिळिला तो येइ फळाला
बळ चढलें गळल्या गात्रांला
चोखोबांना घेउनि नाचे भागवतांचा मेळा हो

पडती आनंदाश्रू त्यांचे
पायपोस पसरा हृदयाचे
त्यावरुनी हरि आणूं या घरिं चला करूं दहिंकाला हो

प्रज्वळल्या नयनां प्राणांनीं
गाउनि ओव्या गाउनि गाणीं
उजळित सदनें उजळित गगनें या हरिला ओवाळा हो

मुंबई २७-३-४६

## हांसत लावा वज्रटिळा

रडते आई घाई घाई ताडित दीन ललाटा हो
ग्रह-नक्षत्रें फोडिति टाहो, हिमनग पेटत वाहे हो

या मंगल रक्तानें भूमी लांछित कंपित झाली हो
या घायांनीं हरिच्या हृदया शतकांची कळ आली हो

खिस्त गाळितो मूक आसवें, दुःखीं बुद्ध बुडाला हो
दंख कलीचा सात युगांचा जडला वंशवडाला हो

या हत्येचें पातक खडतर किती पिढ्यांना जाळिल हो ?
कोण तुम्हांविण निज हृदयानें तात ! तयांना क्षाळिल हो ?

जीवन तुमच नाहीं कळलें आम्हां अंधपणानें हो
यापुढती तरि कळेल का तें या तुमच्या मरणानें हो ?

तुम्हींच लिहिल्या नक्षत्रांच्या ओळी अमुच्या भाळीं हो
डोळ्यांविण त्या व्यर्थ म्हणुनि हा अनर्थ आतां जाळी हो

पंचत्वांतुनि हृत्तत्वांतुनि आतां तरि ते उघडा हो
उदयांतुनि वा प्रलयांतुनिही धडा वाचवा निघडा हो

क्षमा तुम्हीं शिकविली क्षमेला निर्मल निजरुधिरानें हो
ती अमुच्या या पिंडीं भिनवा तिच्यांतल्या अन्नानें हो

प्राक्तन यमुनेचें उजळविलें तुम्हींच निज भस्मानें हो
तिच्या जळाच्या आचमनांतुनि त्रिवार या नेमानें हो

व्हा अमुच्या जठरांत हुताशन, अनृत सगळें जाळा हो
पाप न शमें तावर फुलवा सर्वांगांतुन ज्वाळा हो

या वायूच्या प्रतिश्वासांतुनि हृदयांतील विष वारा हो
आणि स्पंदनांतुनि प्राणाच्या व्हा परमामृतधारा हो

आकाशांतुनि ओंकारत या शांतिः शांतिः शांतिः हो
या ज्योतिर्मय स्वप्न होउनी निजतां नित्य निवांतीं हो

कोटिगुणित होउनि ह्या राष्ट्रीं विराटरूपीं प्रगटा हो
हांसत लावा वज्राटिळा अन् सकळांच्या अदृष्टा हो

मुंबई १-२-१९४८

## हांसत लावा वज्रटिळा

रडते आई धाई धाई ताडित दीन ललाटा हो
ग्रह-नक्षत्रें फोडिति टाहो, हिमनग पेटत वाहे हो
या मंगल रक्तानें भूमी लांछित कंपित झाली हो
या घायांनीं हरिच्या हृदया शतकांची कळ आली हो

खिस्त गाळितो मूक आसवें, दुःखीं बुद्ध बुडाला हो
डंख कलीचा सात युगांचा जडला वंशवडाला हो

या हत्येचें पातक खडतर किती पिढ्यांना जाळिल हो ?
कोण तुम्हांविण निज हृदयानें तात ! तयांना क्षाळिल हो ?

जीवन तुमच नाहीं कळलें आम्हां अंधपणानें हो
यापुढती तरि कळेल का तें या तुमच्या मरणानें हो ?

तुम्हींच लिहिल्या नक्षत्रांच्या ओळी अमुच्या भाळीं हो
डोळ्यांविण त्या व्यर्थ म्हणुनि हा अनर्थ आतां जाळी हो

पंचत्वांतुनि हृत्तत्वांतुनि आतां तरि ते उघडा हो
उदयांतुनि वा प्रलयांतुनिही धडा वाचवा निधडा हो

क्षमा तुम्हीं शिकविली क्षमेला निर्मल निजरुधिरानें हो
ती अमुच्या या पिंडीं भिनवा तिच्यांतल्या अन्नानें हो

प्राक्तन यमुनेचें उजळविलें तुम्हींच निज भस्मानें हो
तिच्या जळाच्या आचमनांतुनि त्रिवार या नेमानें हो

व्हा अमुच्या जठरांत हुताशन, अनृत सगळें जाळा हो
पाप न शमलें तावर फुलवा सर्वांगांतुन ज्वाळा हो

या वायूच्या प्रतिश्वासांतुनि हृदयांतील विष वारा हो
आणि स्पंदनांतुनि प्राणाच्या व्हा परमामृतधारा हो

आकाशांतुनि ओंकारत या शांतिः शांतिः शांतिः हो
या ज्योतिर्मय स्वप्न होउनी निजतां नित्य निवांतीं हो

कोटिगुणित होउनि ह्या राष्ट्रीं विराटरूपीं प्रगटा हो
हांसत लावा वज्राटिळा अन् सकळांच्या अदृष्टा हो

मुंबई　　　　　　　　　　　　१-२-१९४८

## ‘ आमार जीवनइ आमार वानी ’

‘ आमार जीवनइ आमार वानी ’ [१]
वहाणीं बोलतें गंगेचें पाणी

क्षाळितें पाप
वारितें ताप
खालचें जीवन वरती आणी
‘ आमार जीवनइ आमार वानी ’

‘ आमार जीवनइ आमार वानी ’
उषेच्या उद्गमीं द्विजांचीं गाणीं
इंदिरा श्रमे
धरित्री नमे
ओटींत घेऊन रत्नांच्या खाणी
‘ आमार जीवनइ आमार बानी ’

‘ आमार जीवनइ आमार वानी ’
कर्मांत श्रद्धा जागे प्रमाणीं
लाविते दीप
आत्म्यासमीप
भविष्य रेखीत युगांच्या ध्यानीं
‘ आमार जीबनइ आमार वानी ’

आमार जीवनइ आमार वानी ’
शब्दां न उसव, जहालों मौनी
आतांचे डोळे
पाहून ओले
श्रद्धा, उषा आणि जहालों पाणी
‘आमार जीवनइ आमार वानी ’

पुणें ९-१०-४९

१ नोवाखाली-यात्रेमध्यें म. गांधींजवळ कोणीं स्वाक्षरी-संदेश मागितला असतांना त्यांनीं हें उत्तर दिलें : “ आमार जीवनइ आमार बानी-माझें जीवनच माझा संदेश आहे. ”

## ‘ आमार जीबनइ आमार बानी ’

‘ आमार जीवनइ आमार वानी ’ [१]
वहाणीं बोलतें गंगेचें पाणी

क्षाळितें पाप
वारितें ताप
खालचें जीवन वरती आणी
‘ आमार जीबनइ आमार वानी ’

‘ आमार जीवनइ आमार वानी ’
उषेच्या उद्गमीं द्विजांचीं गाणीं
इंदिरा श्रमे
धरित्री नमे
ओटींत घेऊन रत्नांच्या खाणी
‘ आमार जीवनइ आमार बानी ’

‘ आमार जीवनइ आमार वानी ’
कर्मांत श्रद्धा जागे प्रमाणीं
लाविते दीप
आत्म्यासमीप
भविष्य रेखीत युगांच्या ध्यानीं
‘ आमार जीवनइ आमार वानी ’

आमार जीवनइ आमार वानी ’
शब्दां न उसव, जहालों मौनी।
आर्तांचे डोळे
पाहून ओले
श्रद्धा, उषा आणि जहालों पाणी।
‘ आमार जीवनइ आमार वानी ’

पुणें ९-१०-४९

१ नोवाखाली-यात्रेमध्यें म. गांधींजवळ कोणीं स्वाक्षरी-संदेश मागितला असतांना त्यांनीं हें उत्तर दिलें : “आमार जीवनइ आमार बानी-माझें जीवनच माझा संदेश आहे.”

## असलें हें फळ केविं तपाला ?

असलें हें फळ कैंवि तपाला ? कुठलीं पापें झालीं गोळा !
वसोत बसले कान आमुचे, तात, तुम्हीं पिंडांतुन बोला

पुण्य मुहूर्तीं घरांत शिरलों, तोंच वास्तु ही दुमंग झाली
तुटून पडली देवघरांतिल युगायुगांची अन् माठोळी

गोड तुम्ही जी आळ लाविली, आंबा होउनि पाडा आली
फळांतुनी पहिल्याच कशी हो तुम्हांस डसली तक्षक-आळी ?

तुमचें पडलें रक्त शिरावर आणि आमुचीं फिरलीं माथीं
हातीं आलें सोनें त्याची बघतां बघतां झाली माती

हिंसेवांचुन शार्य दिसेना, सत्तेवांचुन सत्य पटेना
कपिला दुभते दारीं तरिही संशय अमुचा कसा फिटेना ?

थेटर झालें अमुचें देउळ, मकानामधें दुकान आलें
आणि आमुचें शील मिरवितें पांढऱ्यांत गुंडाळुन काळें

कमळें तुडवुनि गाळ चिवडिते नवी 'युगंधर' अमुची कविता
धुर्णीं धुण्यांतच रंगुनि वाहे अमुच्या साहित्याची सरिता

कसतो त्याला ना घड भाकर, श्वान धनाचा चघळी पोळी
कुलटेच्या न्हाणींत सारिते पतिव्रता गंधाची मोळी

खाकी जाउनि आली खादी तरी न सरल्या लाथा, गोळ्या
अजून रडती काळोखांतुन पिचलया मळल्या साड्या चोळ्या

परार्घलक्ष्मी पडली भूमी, तरि काखेला अमुच्या झोळी
स्वातंत्र्याच्या पारावरती अमुच्या चारित्र्याची होळी

तुमच्या नांवावरती आम्ही पुण्य म्हणोनी पापें विकतों
तुम्हांस पुरतें गाडायाला कुशल स्मारकें बांधूं शिकतों

स्वर्णमालिनी फुटली अंगीं नखें कातडी स्रवती धारा
आणि चालला कली पुकारित दिवसाढवळ्या अमुचे वारा

खतासारखी तरीहि तुमची मुळांत अमुच्या वसते भाषा
श्रद्धा तुमची अमुचें जीवन, तुमचें जीवन अमुची आशा

द्या हो द्या उःशाप अम्हांला, झाडा हृदयांतली काजळी
रुधिरांतलि नरकासुर जाळा, प्राणांतुन पाजळा दिवाळी.

पुणें १३-९-४९

## भगवती स्वतंत्रतेस–

गोजिऱ्या कळ्याफुलांत लाव गे दिवे
लाजऱ्या गळ्यांत गीत जागवीं नवें

दे गे झाडास गती
दे दे पक्ष्यांस धृती
दे गे माशांस मती ज्यांस जें हवें

आण गे श्रमास मान
आणखी कलेंत प्राण
दे मना भुईसमान स्वप्न पांचवें

दे गे सर्वांस घांस
अन् सुवास वासनांस
नी निचेष्ट भावनांस गोड आंसवें

प्रीतिची जिवास ओल
मुक्तिचा कृतीस डौल
जीवना नवीन मोल यज्ञवैभवें

आण पालवी यशास
अन् घरोघरीं प्रकाश
खेळण्यास दे मुलांस मोर, पारवे

वाहनास देइं मेघ
अन् भुजांस वायुवेग
लंघण्यास विश्वरेघ गे विजेसवें

दे मज रवि–वेदमंत्र
दाखव विधि–विश्व–यंत्र
अन् शनिचें घाल मला दिव्य जानवें

मुंबई ७–८–४७

## अंतरींच्या अश्रुंनो !

अंतरींच्या अश्रुंनो ! निष्ठूर व्हा हो, शूर व्हा
अग्निच्या जिव्हांप्रमाणें उग्र व्हा, अत्युग्र व्हा !

बिंदु व्हा तेजाब्रचे, द्या रुद्रदीक्षा जीवना
उग्र कारुण्यें स्वयंभू कांचनाला वांचवा

कोवळे पाण्यापरी तुम्ही जरी माझे सखे
आज आर्तांकारणें हो तीव्रसे शस्त्राग्र व्हा

गोजिऱ्या मुद्रेंतुनी दावूं नका–दावूं नका
मत्सखींचीं कोवळालीं साश्रुबिंबें या जिवा

आइचें वात्सल्य माझ्या नी पित्याचा संयम
आणि माया अर्भकांची मागुती हो पाठवा

मोह हे आप्तादिकांचे लोभ, आशा, वासना
भस्मुनी संन्यस्त व्हा, निःसंग व्हा, अव्यंग व्हा

पुण्य माझें आठवा अन् पिंड माझा पेटवा
होउनी या हो प्रभूच्या स्वप्नपक्ष्यांचा थवा

या करंट्या जीवनीं संजीवनीचे बोल व्हा
अनृतीं या हो ऋताच्या अन् अणूंचे गोल व्हा

जाळुनि संसार हा शाहीर व्हा हो, वीर व्हा
संचितानें रंकटीं या वंचितांचे धीर व्हा !

मुंबई १०–७–४७

## तिरंगी झेंड्यास गोव्याचें निमंत्रण

लहरत ये, विहरत ये, हिंद्वी ध्वजा रे,
आतुर तुज कवळण्यास आमुच्या भुजा रे !

अमुच्या गोव्यांत फुलें,
दुर्वांकुर मधुर फळें
तांदुळ नारळ सुसज्ज पूजना तुझ्या रे

तुजसम वन हरित तिथें
तुजसम भू लाल तिथें
तुजसम शुभ फेनधवल सिंधु शैलजा रे

शुचि असून शापविद्ध
चल असून दीन बद्ध
द्रौपदिसम बाहे तुज शांभवी प्रजा रे

चक्रं तव दनुजदमन
नमव शकुनि दुःशासन
लाज रक्षिण्या न आज तुजविणें दुजा रे

तुजविण संचित जळतें
तुजविण सौभाग्य रितें
तुजविण बंदींत देघ भोगिती सजा रे

आशांनीं निज हिरव्या
भावांनीं धवल नव्या
गौरव रुधिरें भगव्या रंगवूं तुझा रे

दगड तिथें तडफडती
ऋत, धृति, मति तळमळती
अंधारीं घोर भयद, तळपती विजा रे

ये जय जय राजेश्वर
उद्धर जन, देव, पितर
अन् माझी व्यथित बद्ध शब्दसारजा रे

मुंबई २१-५-४१

## स्वातंत्र्यलक्ष्मीस

स्वर्णारुण अंशुमालि भाग्यतिलक भालीं
कोटिचंद्र कोटि अरुण इंद्रनील गालीं

नयनिं हिच्या गहन निशा
बिम्बाधरिं उदित उषा
मुदित करित दाहि दिशा चारुता निघाली

प्रलयाच्या प्रहरांतुन
कलहाच्या जहरांतुन
मंथनांतुनी महान लक्षुमिसम आली

वाम करीं अनल वरी
सव्य करीं कमल धरी
क्रांति शांति खेळवीत पाप ताप जाळी

चिंतामणि चरण हिचे
कौस्तुभमणि या महिचे
रत्नजडित करिं भविष्य सहज चरणचाली

माय पावली तपास
त्रास संपले उपास
माप भक्तिचें भरून मुक्तिदान घाली

जाळुनि मनिं दीपधूप
होउनि शुचि एकरूप
स्वागता सुसज्ज सर्व होउं पर्वकाळीं

अन् हिचें पसायदान
सेवुनी सवें समान
साजरी करूं चला महान ही दिवाळी

मुंबई ५-७-४९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 6840

## श्रावणदर्शन

गिरीदरींतुनि झरे-नव्हे हे हिरे उसळती निळे
ढगाढगांतुनि अन् पाऱ्यापरि ऊन गळे कोवळें

उदंड पाणी जिकडे तिकडे पाच फुले मोहरे
सुखें जडावुनि चढण उतरती सुस्त गुरेंवासरें

त्रिदोषशामक श्वास सोडिती मुनिसम वन्यौषधी
कुंकुम चर्चुनि देवगाउल्या न कळे आल्या कधीं

हर्षी कुणी मंडूक संपवुनि उपनिषदांची ऋचा
रविकिरणांचें भस्म लावुनी उबवित बसला त्वचा

हवेंत फिरतें कुणी पांखरूं घुमत भिंगरीपरी
वर्ख रुपेरी लावुनि झुलती सुमनें दर्भांकुरीं

फुलली पत्री सुख सर्वत्रीं जीवन गात्रीं स्फुरे
कुरणांतुनि जल तुडविंत, उडवित बागडती लेकरें

सुमां अत्तर घालुनि हिंडे वारा स्वप्नामधीं
परी नवोढा धुंदींतच ही गात चालली नदी !

सालंकृत हिरव्या हातावर गोंजारित पारवा
वनदेवी पंखांतुनि पळवी काय ? वदा, आठवा !

वडिलधाऱ्यां पोथी-कीर्तन घरोघरीं, मंदिरीं
सणसे दिन हे क्रमूं सुखानें आपण उघड्यावरी

विसरूं खंती पायांपुढती प्राजक्ताचे सडे
हंसती युवती कटाक्ष त्यांचे भांगाहुनि वांकडे !

कृतज्ञतेनें उत्साहानें पाहूं मागेंपुढें
स्मरूं, आदरूं, आले, येतिल जे जे अमुच्याकडे !

केंपें ২८-७-४४

## आकाशमाउलीस

कोर विलोरी तुझ्या कपाळीं शिरिं मोत्यांची जाळी ग
तुझ्या लोचनीं मुक्तात्म्यांची शाश्वत नित्य दिवाळी ग

हरिकांतीचें वस्त्र वनूवर त्यावर ज्योतिष्चित्रें ग
स्रवती त्यांतुन परम पवित्रें अलिखित संतचरित्रें ग

पाप जाळुनी काजळ त्याचें गौराविसी निज नयनीं ग
पाणी सतिच्या मुद्रेवरचें गाळुनि उजळिसि वदनीं ग

कूस तुझी नवरत्नकेतकी पराग भास्वत कोटी ग
अन् चंद्रांनीं भरुनी वाहे तुझी सुवासिन ओटी ग

वात्सल्याची तूं गायत्री, देवदयार्णव पोटीं ग
दुभुनी निशिदिनिं पोशिसि साम्यें भूतें लहान मोठीं ग

तूं ऋषिचें तप, तूं कविप्रतिभा तूं मुनियोगसमाधी ग
तूं श्रमसुखरत निष्पापांची शुभनिद्रा निरुपाधी ग

कर पावन तव या शिरिं असतां घर आम्हां नित जवळी ग
अमृतकमळें फुलुनी येती या तापत्रय-गरळीं ग

माते ! निजकरिं जग हें अमुचें पक्ष्यापरि कुरवाळीं ग
हृदया त्याच्या शर लागुनिया आली लाल जिव्हाळी ग

सुखशांतीचा, विश्रांतीचा फुंकर सांजसकाळीं ग
घालुनि त्याला शिकव म्हणाया दिव्य अनंतभुपाळी ग

मुंबई — २८-३-४७

## सागरास—

अलों चालुनि वाट युगांची
आणि गांठिला तुझा किनारा

शिणल्या शरिरावरी तरारे
तव लाटांपरि दाट शहारा

गेला दिन मन खोलुनि जळतें
वाहुनि तुज रक्ताची ओंजळ

वितळूं लागे मधु रजनीच्या
निळ्या निळ्या डोळ्यांतील काजळ

क्षितिजाच्या झिलईत नाहलें
धवल शिडाचें निश्चल तारूं

पडे दिशांच्या अष्टदलावर
भग्नपर्ण जणुं फूलपांखरूं

हरवुनिया कंठांतिल माला
शिणुनी फिरले खग माघारे

२११३१ काव्य
७३४८ दि. ३०.११.८६

छायांच्या रायांत थरकले
हिरवे काळे लाख मनोरे

चढवित पारा चंद्र चितारी
तरि कांचेची निळी इमारत

चंचलतेनें काढुं पाहे
भंगुरतेवर चित्रें शाश्वत

मीहि कैकदां तव पुलिनीं या
रचिले सुंदर किल्ले इमले

मोहुनियां रत्नांच्या मोलें
किती वेचिलें शंखशिंपले !

आनंदाच्या निळया पांढऱ्या
लाटा नच मावुनिया पोटीं

तुझ्याच परि मी गात लोळलों
कर्पुरकाणिकांच्या या कांठीं

सुगंधजालीं बांधुनि नंतर
जधीं विंधिलें मला फुलांनीं

स्फटिकाच्या पात्रांतुन दिधली
तूंच लाल फेसाळ वारुणी

धुतल्या जखमा आळवीत तूं
क्षितिजींचीं सोन्याचीं गाणीं

विष हृदयांतिल वाहुनि नेतां
तुझें जांभळें झालें पाणी

सखिला मानूनि मानसकन्या
दिले इथें तूं मज नजराणे

छंद तराणे गाउनि झालों
कधीं शहाणे, कधीं दिवाणे

बाल्य निमालें, सरली मादक
तरुणपणाची नवी नव्हाळी

लाख भुकांची, लाख मुखांची
आली कानीं हांक विखाळी

श्वासें त्यांच्या राख उडाली
लकाकलें हृदयांतिल स्थंडिल

अमृत वारुणि पुरति न आतां
लाख पशांतुन आण हलाहल

जळो, जळो स्वास्थ्याचें कुंपण
दुबळ्या आकांक्षांचें घरकुल

तुझ्यापरी रुधिरांत उठूं दे-
अखंड धडपड,अखंड तळमळ

कळे मला कां म्हणती तुजला
रत्नाकर, तीर्थांचें आगर

शिकव जगाचें दुःख गिळुनियां
फळांफुलांनीं भरण्या डोंगर

थकतां माथा असाच दे मज
मायकुशीसम तुझा किनारा

नश्वर नेत्रांपुढें असूं दे
ईश्वरतेचा सदा पसारा

केळवें — १९-११-४२

## माडाचें भावगीत

ताठ उंच मी उभा नभास नित्य वाहुनी
राहिलों तुझ्याचसाठिं बाहु हे उभारुनी

स्वर्ग सांडिला मुदें तुझ्याच मुक्तिकारणें
देह वाहिला तुला, तुलाच वाहिलें जिणें

तापतां उन्हीं तुला दिली प्रशांत सावली
भागवावया तहान गोड गार शाहळीं

मेघ वारिले किती सुरम्य बांधुनी मठी
खावया दिलीं तुला फळें रसाळ गोमटीं

स्नान उष्ण घातलें तनूस तेल लावुनी
घांस लाविले मुखा मुठेल त्यांत वाहुनी

रात दाटतां घरीं सुवर्णदीप लाविले
कुंतलीं प्रभातकालिं दैन्य सर्व झाडिलें

लग्नकारणीं, सणासुदीस, दुःखसंकटीं
साह्य मीं दिलें तुला सदैव बांधुनी कटी

स्वर्ग दाविण्या तुला स्वतःच जाहलों शिडी
चांदण्याचिया तुला दिल्या भरून कावडी

गीत ऐकुनी तुझें तरारलों थरारलों
नी चितारुनी भविष्य मी सहर्ष डोललों

तूं परी कृपेमुळेंच होसि नित्य आंधळा
अन् सुखामुळेंच जासि दुर्गतीचिया तळा

शंभु ठाकतां समोर गांगतीर्थ सांडुनी
कंठिच्या हलाहलास जासि शीघ्र मोहुनी

कोटितीर्थ, मानवा ! असून माझिया शिरीं
तूं विषार्थ लाविली गळयास माझिया सुरी

स्वर्ग लाभतां करीं तयास नेसि रौरवा
धन्य धन्य बुद्धि रे तुझी विचित्र मानवा !

दुर्गतींतही परी तुला करीन साथ मी
भावबद्ध मी तुला, तुझाच मित्र नेहमीं

भाविलें तुझ्यासवें रमेन दिव्य गौरवीं
स्वप्न तें विरून आज मी विषण्ण रौरवीं

•

मुंबई २६-५-४६

## एक सायंचित्र

लाल केशरी गुलमोहरचे क्षितिजीं फुलले तुरे
आणि फुटाण्यांपरी उडालीं दिपलेलीं पांखरें

सर्कशींतल्या बालकांपरी धीट चपल कोंकरें
आढ्यावरुनी खुडींत होतीं कोमल पानें त्वरें

बिंब तयांचें होतें पडलें निळसर ओढ्यामधें
गार उन्हांतिल चित्र दुहेरी तरळत होतें मुदें

हिरव्या कांचेचीं पोफळिचीं झळझळलीं झावळें
कुळागराचे खांब रुपेरी थरारुनी थांबले

सुवास चांफ्याचा कुजबुजला न कळे आला कुठून
आणि कुणाचें गुपीत गेला वाऱ्यावर उलगडून

स्मरकवनाचा चरण माझिया स्फुरला ओठांमधून
कंकणरव हांसला अचानक, त्वरित पाहिलें वळून

शब्द थबकले वदनामधले, स्तिमित जाहलों तदा
वीज निघाली डोळ्यांपुढुनी तुडवित जलसंपदा

स्वरांवरी ते गुंफित गेली धरित तांबड्या निऱ्या
गौर वांकुल्या दावित गेल्या भिजलेल्या पोटऱ्यां

कवन जाहलें पुरें तरीही सळसळती झावळें
खळबळतें मनिं काय कळे ना, ऊन मात्र मावळे

बोरी — १४-१२-४१

## खिडक्यांवर वाजे वारा

खिडक्यांवर वाजे वारा ग
चल उघड सुंदरी दारा

रस्त्यांत धुळिचे भंवरे
नभ क्षणांत झालें गहिरें
रवि ठिबके होउनि पारा ग

खोडांतुनि फुटले भास
दगडांतुनि सुटले श्वास
रजताच्या झडल्या धारा ग

सांभाळित अंचल ओंचे
उघडलें दैव कोणाचें ?
निर्वेध वेंचुं या गारा ग

करुं मुखांत त्यांचें पाणी
आकळूं ऋतू गात्रांनीं
दो क्षणांत निववुं सहारा ग

उच्छृंखल यौवन नाचे
भय सरे जरा मरणाचें
ये बहर पुन्हा शृंगारा ग

मातींतुनि खिदळे पाणी
पाण्यांतुनि फुटती गाणीं
गाण्यांत हिरवळे चारा ग

प्राणांत नवनिच ज्योती
पावळींत झालर मोती
नवतोरण घरसंसारा ग

पुणें १०-७-५०

## माझ्या गोव्याच्या भूमींत—

माझ्या गोव्याच्या भूमींत
गड्या नारळ मधाचे
कड्या कपारींमधोनी
घट फुटती दुधाचे

माझ्या गोव्याच्या भूमींत
आंब्या फणसांची रास
फुलीं फळांचे पाझर
फळीं फुलांचे सुवास

माझ्या गोव्याच्या भूमींत
वनश्रीची कारागिरी
पानाफुलांची कुसर
पशुपक्ष्यांच्या किनारी

माझ्या गोव्याच्या भूमींत
उन्हाळ्यांत खारा वारा
पावसांत दारापुढें
सोन्याचांदीच्या रे धारा

माझ्या गोव्याच्या भूमींत
येतें चांदणें माहेरा
ओलावल्या लोचनांनीं
भेटे आकाश सागरा

माझ्या गोव्याच्या भूमींत
चांफा पानाविण फुले
भोळा भाबडा शालीन
भाव शब्दांवीण बोले

माझ्या गोव्याच्या भूमींत
गड्या साळीचा रे भात
वाढी आईच्या मायेनें
सोनकेवड्याचा हात

माझ्या गोव्याच्या भूमींत
सागरांत खेळे चांदी
आतिथ्याची अगत्याची
साऱ्या षड्रसांची नांदी

माझ्या गोव्याच्या भूमींत
जिव्या सुपारीचा विडा
अग्निदिव्यांतून हंसे
पाचपोवळ्यांचा चुडा

माझ्या गोव्याच्या भूमींत
काळे काजळाचे डोळे
त्यांत सावित्रीची माया
जन्मजन्मांतरीं जळे

माझ्या गोव्याच्या भूमींत
लाल माती निळें पाणी
खोल आरक्त घावांत
शुद्ध वेदनांचीं गाणीं

माझ्या गोव्याच्या भूमींत
खड्गा जडावाची मूठ
वीर शृंगाराच्या भाळीं
साजे वैराग्याची तीट

माझ्या गोव्याच्या भूमींत
उंच घूड देवळांचे
ताजमहाल भक्तीच्या
अश्रूंतल्या चांदण्याचे

माझ्या गोव्याच्या भूमींत
तृणीं सुमनांचे गेंद
सिद्ध कुणब्यांच्या तोंडीं
शुद्ध सौंदर्याचे वेद

माझ्या गोव्याच्या भूमींत
सुखाहुनी गोड व्यथा
रामायणाहुनी थोर
मूक उर्मिलेची कथा

माझ्या गोव्याच्या भूमींत
सारा माझा जीव जडे
पुरा माझ्या कवनांचा
गंध तेथें उलगडे

पुणें

ता. ११-७-५०

## करी मला वज्रदेही

अंधार हा धृतराष्ट्र, पृथ्वी ! भाससी गांधारी
ज्योतिष्मती माये कां गे डोळा बांधिसी अंधारी ?

मौनाचिया शिंपल्यांत फळे मुक्ताफळ-वाणी
बंद लोचनीं तुझ्या का तशा प्रकाशाच्या खाणी ?

डोळे असून मी आई ! कां गे अजून आंधळा ?
ठेंचाळतों पदोपदीं, पाय असून पांगळा ?

मद्य काळोखाचें प्यालों त्याची झाली उरीं आग
वळवळे विळांतले झोंपलेले काळनाग

ज्वाला ओकीत मी झालों साऱ्या जगत्रया धाक
अंतरींच्या ओकेपणीं उठे विनाशाची हांक !

आतां सामर्थ्यचि माझें मला उठलें खावया
तुझी आठवली आई ! अमर्याद दया माया

नाहीं आतां व्हावयाची पूर्वजन्मींची ती चूक
अनुतापाच्या या क्षणीं झालें संचित ठाऊक

जसा जन्मलों तसा गे, तुझ्यापुढें उभा ठेलों
सर्व लज्जा, अहंकार स्वयें ओलांडून गेलों

काढ डोळ्याचें बांधप मला सारा पुरा पाही
आणि उभाच जाळून करी मला वज्रदेही !

पुणें ८-६-४८

माझ्या गोव्याच्या भूमींत
खड्गा जडावाची मूठ
वीर शृंगाराच्या भाळीं
साजे वैराग्याची तीट

माझ्या गोव्याच्या भूमींत
उंच घूड देवळांचे
ताजमहाल भक्तीच्या
अश्रूंतल्या चांदण्याचे

माझ्या गोव्याच्या भूमींत
तृणीं सुमनांचे गेंद
सिद्ध कुणब्यांच्या तोंडीं
शुद्ध सौंदर्याचे वेद

माझ्या गोव्याच्या भूमींत
सुखाहुनी गोड व्यथा
रामायणाहुनी थोर
मूक उर्मिलेची कथा

माझ्या गोव्याच्या भूमींत
सारा माझा जीव जडे
पुरा माझ्या कवनांचा
गंध तेथें उलगडे

पुणें ता. ११-७-५०

## करी मला वज्रदेही

अंधार हा धृतराष्ट्र, पृथ्वी ! भाससी गांधारी
ज्योतिष्मती माये कां गे डोळा बांधिसी अंधारी ?

मौनाचिया शिंपल्यांत फळे मुक्ताफळ-वाणी
बंद लोचनीं तुझ्या का तशा प्रकाशाच्या खाणी ?

डोळे असून मी आई ! कां गे अजून आंधळा ?
ठेंचाळतों पदोपदीं, पाय असून पांगळा ?

मद्य काळोखाचें प्यालों त्याची झाली उरीं आग
चळावले विळांतले झोंपलेले काळनाग

ज्वाला ओकीत मी झालों साऱ्या जगत्रया धाक
अंतरींच्या ओकेपणीं उठे विनाशाची हांक !

आतां सामर्थ्यचि माझें मला उठलें खावया
तुझी आठवली आई ! अमर्याद दया माया

नाहीं आतां व्हावयाची पूर्वजन्मींची ती चूक
अनुतापाच्या या क्षणीं झालें संचित ठाऊक

जसा जन्मलों तसा गे, तुझ्यापुढें उभा ठेलों
सर्व लज्जा, अहंकार स्वयें ओलांडून गेलों

काढ डोळ्याचें बांधप मला सारा पुरा पाही
आणि उभाच जाळून करी मला वज्रदेही !

पुणें ८-६-४८

## मुखवट्यास

केलास मुखवट्या ! तूंच आजवर घात
कोंडिलास माझा प्राणच काळोखांत
प्रणवाचा त्यांतुनि सुटला वादळवारा
जा उडत ओरडत असा सात गगनांत !

तव आक्रोशानें मिळेल पितरां शांती
मम मुक्तीस्तव जे झुरले नित्य निवान्तीं
हर्षुनी उघडतिल पंच भुतांचे डोळे
दर्शनें माझिया येइल त्यां नवकांती

तोडिशील कुठवर सांग सनातन नातें
जोडिते मला जें आणि सकल विश्वातें ?
जड करूं शके का चैतन्या अटकाव ?
का झरा दुभंगे काठीच्या आघातें ?

तूं श्वास निरोधुनि वय मम चोरुनि नेलें
मुख दावुनि मजला मूक आजवर केलें

कानांवर माझ्या हळुच ठेवुनि हात
वदलास मला ' पाळण्यांत गायन मेलॅं '

नेत्रांचीं माझ्या अडवियलीं तूं पातीं
जग धूसर केलें पसरुनि कपट सभोंतीं
मिरवलास माझ्या रूपावरती बसुनी
करुनियां तनूला आधाराची काठी

वदलास सदा मज कोंडिल हा तुज वारा
कल्लोळ स्वरांचा घालिल कानीं पारा
फिरवील बाहुल्या प्रकाश हा सुलतानी
बोलतां दिशांतुनि होइल निर्दय मारा

मज ठावा सगळा तुझा घातकी कावा
सिद्धांतच मुळिं दुबळ्या नच मोक्ष मिळावा
जोंवरीं मुखीं मम गंज तुझ्या दास्याचा
तोंवरी शांतिचा राहिल मजशीं दावा

म्हण खुशाल क्रोधें कुरूप मजला, मूर्खा।
तुज मुळेंच झडली मम रूपाची रेखा
मज लोभ नसे तव नकली लावण्याचा
जें बांधुनि ठेवी ललाटिंच्या आलेखा

तव दायादांच्या भुताटकीचा जाच
किति वेळ भोंवतीं चालविशील असाच ?
मी सोऽहं म्हणतां पडतिल दचकुनि खालीं
अन् होइल त्यांवर अग्नीचा नटनाच

कुडचडें                                                  १६-९-४१

## इमानी कुत्र्यास

तूं मान स्वताला थोराघरचा श्वान
जा राजपथांहुन ताठ उभारुन मान
    मुळिं पाहुं नको तूं वळुनी या वाटेला
होईल कलंकित रे तव थोर इमान !

तुज चपल बोलती निर्भय वीर शिकारी
वाखाणित कंठीं घालिति पट्टा दोरी
    हीं दास्यभूषणें फिरवित जा डौलांत
छूः म्हणतां पळ जा गुडघे मोडित चारी !

जरि तुझ्या धन्याच्या सुटल्या सूं सूं गोळ्या
रक्ताच्या अमुच्या फुटल्या जरि आरोळ्या
    रे मोड आपुले कान, मिटुनि घे डोळे
तूं चघळ हाडकें, चघळ सुखानें पोळ्या !

जा विसर आपुली जात, आपुला प्राण
ललकार मुखानें पारतंत्र्य—महिमान
    मी चित्र तुझें हें दावुनि पोरा थोरां
चेतवनि त्यांचा निजलेला अभिमान

उद्धरेल जेव्हां सकल आमुचा वंश
तव जपुनी ठेवूं लाचारीचा वेष
    दर्शनें त्याचिया प्रतिदिनिं सायंकाळीं
रे मिळवूं आम्हीं मोक्षाचा संदेश !

कुडचडें    १८-९-४१

## कानफाटयाचा फटका

अश्वत्थामा तेल मागतो ख्रिस्त मागतो पाणी
धनिक मागतो अन् प्रेताच्या टाळूवरचें लोणी
रक्त मागतो सुभाष आणिक सूत मागती गांधी
खादी घालुन लांच मागती वजीर आणिक प्यादीं

कर्ज मागतो किसान आणिक खोत मागतो सारा
भुई मागते खतें आउतें, गुरें मागती चारा
मजूर मागे काम मुशारा, न्याय मागतो कैदी
नेता मागे गर्दी टाळ्या, लोड मागती ऐदी

अन्न मागती फुकटे भटके, आग मागती भाई
भगवा मागे नवा पेशवा अन् ब्राह्मणबादशाही
दाता मागे मोड दहांची, अंध मागतो दिडकी
पोटासाठीं सती मागते एक रिकामी खिडकी

लेक मागतो माधुकरी अन् नवरा मुलगा खोली
नवरी मागे अर्धा हिस्सा, शिक्षणसंस्था झोळी
घरमालक मागतो पागडी, मतें मागती लुच्चे
गाल फुगवुनी खुळचट पोरी दोन मागती गुच्छे

कलावन्त मागतो प्रसिद्धी शिवाय आणिक कांहीं
कोण मागतों काय याजला हिशेब उरला नाहीं
एक मागतों माणुसकी मी पुरे एवढी भिक्षा
रुद्र येतसे मागुन माझ्या घ्याया सत्त्वपरीक्षा

पुणें १८-२-५०

## घेऊं लक्षुमीला घरीं

काल अवसेला केली घरीं पुनव साजरी
ओवाळिले आप्त इष्ट सगे सोयरे शेजारी

संसाराच्या या गाड्याला ज्यांनीं दिला खांदा हात
बालकांच्या हातें त्यांना केली चांदीची खैरात

परी एक विसरलों सये चुकलों पायरी
बुंद लाथाडुनीं गेला सर्व पुण्याच्या घागरी

कालच्या त्या आनंदाचा आज केर झाला दारीं
तेथें मंगल कराया आली लक्ष्मीची स्वारी

तीरापरी उरीं माझ्या रुते तिची ललकारी
जगापरी आपणही झालों स्वार्थांध बाजारी

विसरलों पुरातन वाडवडिलांची रीत
पायीं मोडियली त्यांनीं हातें घातलेली नीत

वर्षभरी आपुलालें जिनें अंगण झाडिलें
उपेक्षेच्या कोपऱ्यात तिला आपण सांडिलें

आरोग्याची पावित्र्याची जिनें वाहियली चिंता
तिची सेवा तुडवून गेली आपुली अहंता

संबोधून केरसुणी केली तिची हेटाळणी
कृतघ्नतेमुळें झाली व्यर्थ सारी ओवाळणी

खंत खेद नाहीं तिला ती गे सेवापरायण
आतां तरी आण वेगें राट कुंकू निरांजन

घेऊं फोडूनिया गाल घासूं कपाळ भुईला
पश्चात्तापाच्या अश्रूंनीं चल ओवाळूं या तिला

काल जनांची दिवाळी केली आपण साजरी
आज मनांतली करूं घेऊं लक्ष्मीला घरीं

पुणें २६-१०-४९

## घन नाहीं हें पाणी

घन नाहीं हें पाणी
कोटि भगीरथ खपले तपले मग फुटलें पाषाणीं

खेळत खेळत त्यानें जावें
जग आशांनीं हिरवें व्हावें
मानव्याचे वृक्ष फळावे, वेली आणि फुलांनीं

याच्या घाटाकांठावरती
पुरें मंदिरें यावीं वरती
रमेउमेची त्यांत घुमावीं भक्तिमुक्तिचीं गाणीं

वाहतसे हें सगरांसाठीं
इतुक्यांतच कां करितां दाटी ?
त्यांच्या शापें ओठीं पोटीं होइल हो विषवन्ही

भिडतां क्षणिं हें त्यांच्या ओठा
फुटेल धो धो बारा वाटा
खुशाल तें मग तुम्हीहि घोटा हर्षें लाख पशांनीं

संचयांत हो हांसें नासें
तीर्थ असुनिही होइळ वासें
कलशाकलशांतुनी शनैश्वर उठतिल भर माध्यान्हीं

रवि घारेला जाण्या आधीं
पात्रीं द्या कलशांस समाधी
हटवा आधी, पिटवा व्याधी माझि न ही युगवाणी

पुणें १७-२-५०

## काळ बोले

काळ बोलें टक टक
उरले सुरलें मोह झटक

काळोखांतच दिसतें खरें
कोण भलें, कोण बुरें
पाहिलेंस खूप, आतां उमज
जशी नेक तशी निपज
निजलेल्यांना घोरूं दे
शिरलेल्यांना चोरूं दे
जीभ आवर, मरशील फुकट
जगणें नंतर त्याहुनि बिकट

अशा जगाचें नको सुतक
काळ बोले टक टक

कुठवर त्याचा घेशील भार
वजनानेंच होशील ठार
शेतांत तण वारंवार
कष्ट सोळा, दाणे चार
ज्याला मृत्यू त्याला घाई
सृष्टि अमृताची आई
म्हणून धीरे गाडी हाक
जमेल तितकें करून टाक
आतल्या आंत लाव टक
काळ बोले टक टक

तिथेंच सर्वस्वाची मूस
आपलाच देह आपला करूस
त्यावर स्वेच्छें खिळेठोक
डोक्यास कांटे आणि खोक
याचच नांव खरें मरण
याचेंच नांव खरें जीवन
असलें रक्त अनासक्त
जातें जगास करून मुक्त
नंतर प्राणा नाहीं अटक
काळ बोले टक टक

पुणें १५-७-५०

## खवीस

खोप बेचिराख झाली
    बिया सांठ्याच्या भाजल्या

स्वतः फोडून सोलून
    त्यानें आवडीनें खाल्ल्या

सांत्वनार्थ जे जे आले
    त्याला ' खवीस ' म्हणाले

वायाबापड्यांचे मात्र
    डोळे पाणावून आले

केपें                                                                                १६-१-५०

## पंढरीस वाजे घंटा

पंढरीस वाजे घंटा पाडुरंग झाला जागा
झाडा मागाया उठल्या गोदा भीमा चंद्रभागा

भटा पंड्या बडव्यांनो ! डोळे उघडून वघा
हात कटींचे हालती राग आला पांडुरंगा

देव भावाचा भुकेला त्यास काय दिलें सांगा ?
लाख मारुनी उपाशीं काय ताटांचिया रांगा ?

देव दीनदुबळ्यांचा डाग कसे त्यांच्या अंगा ?
दारें लाविलींत कशीं भंगी धेड म्हार मांगा ?

काय काजळ फांसिलें तुझ्या चोख्याच्या अभंगा ?
विटाळिली करंट्यांनो ! काय ज्ञानयाची गंगा ?

प्राण इरेला टाकून पांडुरंग रागें उगा
रडा रडा पश्चात्तापें दीनां आलिंगाया लागा

न्हात न्हात आसवांनीं जोडा तुटलेला धागा
महारांच्या महाराष्ट्रीं लावा ब्रह्मत्वाच्या बागा

दारें मोकळून सारीं सानथोरां करा जागा
भरा आषाढी कार्तिकी लाजवा हो यज्ञयागा

मुंबई ३०-३-४७

29939. 9324 30/99/4

# ताज

ताज न मम अश्रुराज हा विराजला गे

हा माझा मूक शोक
आकळून घे त्रिलोक
शुक्तिशोक मौक्तिक या बघुनि लाजला गे

स्वप्नस्मृतिरंग तरल
विरहस्वन मृदुल विकल
सृजिती रसराजकलश, राग उगवला गे

हा तव चिरकाल-शांति
जीवन-लावण्य-कांति
प्राण यांत पाजळावया तुझ्याच लागे

कलिजांतुनि तव ढळला
क्षितिजांतरिं घुटमळला
मम हृदयीं विरघळुनी येथ ओतला गे

कवळुनि गे रति ! तुजला
अश्रुराज हा थिजला
बघुनि या निवेल मदन हृदयिं भाजला

मृत्यु अधर करि दुभंग
परि अभंग आत्मसंग
हा चुंबनगुच्छ साक्ष यांत डंवरला गे

स्तब्ध, चकित येथ काल
लुब्ध, मुग्ध विश्वजाल
भूमिभालिं भाग्यतिलक आज साजला गे

केपें

१०-९-५०

## अमृत खेंचुनि आणूं भूवर

समुद्रवीणा छेडित चंद्रा उधळ निळ्या लहरी
धुंद तुझ्या साथेवर गाते मत्प्रतिभा लहरी

तुझें चांदणें माझें गाणें ये ये चल मिसळूं
माधवींत हिम, दुधांत केशर ये ये चल मिसळूं

नको नको संकोच–झोंपलें जग सगळें शहरी
जागे आपण दोघे असल्या स्वर्गोत्सव प्रहरीं

रसिक खरोखर जे कुणि या क्षणिं गिरिवर वा पुलिनीं
जाग्या ज्या या वेळीं त्या रे ऋतुमति रसनलिनी

कुणि शरविव्हल, कुणि स्मरविव्हल, कुणि अनलीं जळती
आणि कुणी पापाच्या दंशें रुधिरीं तळमळती

व्याख्या नकळुनि ही सख्यानें जीवन त्यां कळतें
जीवन ज्यांना कळतें त्यांना काव्यहि आकळतें

काव्य जयांना उमगे त्यांचा तूं रे रसराज
त्यांत आज तुजवरती माझा चढला स्वरसाज !

गड्या तुझ्यापरि मीही प्यालों सूर्याची आग
परि दर्यापरि आहे वाहे अपुला अनुराग

कळो ना कळो महती अपुली दुर्मुखलया जगता
त्यासाठीं नच अडली केव्हां अमुची रसवत्ता

जहरप्राशन करुनी जेव्हां हर उरिं कळवळला
खेळवुनी तुज निटिलीं त्यानें अतिरस मेळविला

सामर्थ्याची चंदनउटि जी ती सौंदर्य-कला
वन्हि तिच्यांतच हिम होउनिया रसरूपीं थिजला

नीतीला रेखुनि प्रीतीचा लावूं सुभग टिळा
शक्तीच्या शिरिं ये भक्तीचा चढवूं मुकुट निळा

ही श्रीमंती आहे तोंवर चल आनंद करूं
ये उभयांच्या हृदयसुधेनें विश्वकटाह भरूं

समुद्रवीणा छेडित चंद्रा उधळ निळ्या लहरी
अमृत खेंचुनि आणूं भूवर दडलें जें जहरीं

मुंबई २७-११-४७

## समुद्रकांठच्या चांदरातीस

कवण चंद्रकिरणवसन तूं रसज्ञ मालती
शांतिगीत गात गात पातलीस खालती ?

सिंधु हा प्रसन्न मोर
नाचतो मुदें समोर
प्रीति तूंच, गीति तूंच, भासती सरस्वती

हें तुझें सताल गान
ने हरून देहभान
स्वप्नरूप होति सर्व सानथोर आकृती

येति नेत्र पेंगळून
जाति अश्रुहि थिजून
न्हाति दिव्य अमृतांत इंद्रियांचिया स्मृती

ये फुलोन रोम रोम
त्यांत ये भरोन सोम
पुष्पतुल्य होति तेच इंद्रियां अलंकृती

सोडवूनि गात्रपाश
जीव जाय सावकाश
सेवि जीवनोगर्मी रसाळ शीतला द्युती

मंतरून शीणभाग
गा असाच शांतिराग
एकरूप होति ज्यांत नीज, स्वप्न, जागृती

मडगांव ६–२–४२

## शिव ते, द्या त्यांस पिंडावळ

" गा गा धुंदपणें प्रसन्न कवनें गा प्रीतिच्या कोकिळा
तूं गंधर्व तुझ्यामुळें गवसला आम्हां रसांचा मळा
तूं चिंतामणि बोलका तुजपुढें आम्ही मुके पामर
झालों धन्य परंतु ओवुनि तुझ्या कंठी फुलांचे सर '

ऐकोनी वचनें सुकोमल अशीं डोळ्यांत आलें जळ
स्नेहाचें स्मरलें घरांतिल मला माझें गुणी मोहळ
ज्यानीं विस्मरुनी स्वतःस मजला सौख्यें दिलीं नेहमीं
द्याया छत्र मात्र त्रिताप सहिले प्रेमें श्रमीं उद्यमीं

नांवें तीं इतिहासमान्य न जरी, तीं चालतीं पुस्तकें
माझे बोल सुलोल सर्व समजा त्यांचींच हो स्मारकें
सामान्यांतच जें तळें वसतसे स्नेहामृताचें मुकें
त्यांच्यांतूनच आमुचीं उगवती हीं बोलकीं साळकें

गाती मुक्तपणें अखंड कवनें काकांमुळें कोकिळ
त्यांचा वाढवितात वंश, शिव ते, द्या त्यांस पिंडावळ

मुंबई

१८-७-४८

## वृद्ध होऊं तेव्हां

जेव्हां घालिल काल जातिसुमनें शीर्षी गडे आपुल्या
जेव्हां होतिल दाट दीर्घ सरत्या वाटेंतल्या सावल्या
जेव्हां पैलथडीहुनी श्रुतिपथीं येतील घंटारव
जेव्हां मांडिल इंद्रजाल अपुलें या सृष्टिचें लाघव

तेव्हां जातिसुगंध कोंडुनि उरीं गे आर्त होऊं गडे
गुंफोनी कर पाहुं थांवुनि जरा तेजाळलेले कडे
त्यांचे दर्शन घेउनी वळुनिया पाहूं सखे मागुती
जें पावेल इथें विसर्जन, कधीं येईल ना संगतीं

तेव्हां पुत्रसुता सुखें स्मरवनीं होतील क्रीडारत
त्यांना पाहुनि यौवनक्षण करूं आम्ही पुन्हां जागृत
स्मृत्यालंकृति घांसुनी पुसुनियां गे एकमेकांप्रत
लीलेनें स्मरवाटिकेंतच करूं आपाद सालंकृत

सौंदर्यें नव, बोहल्यावर चढूं, साधूं धटीं गोरज
'होवो दंपति ही चिरायु, सुभगे! गातील देव द्विज

आरबाग 14-3-42

## तूं

तू वासंत उषा प्रभातसमयीं माता मला मंगला
सर्वांगावरती सितांतुनि तुझ्या सांडे प्रभाकांचन
आशेचें हिरवें कुळागर मला माझें गमे जीवन
तृप्तीचा नयनांतुनी तव झरा येतां निळा कोवळा

तू संध्यासमयीं जिवास भगिनी येतां श्रमांतीं घरा
कौलारावरच्या धुरापरि तुझी दृष्टी मला तोषद
ती घंटारवशी क्षणीं श्रम हरी वाणी तुझी सद्गद
संध्यारंगतरंगसे स्वर तुझे शृंगारिती अंतरा

वेळीं कातर गे तिच्यापरि सखे घालूनियां फुंकर
तूं देतां न कळूं हळू हरविशी माझ्या मनींचीं सलें
तूतें का निशिगंधमत्त हळव्या स्वच्छंद मंदानिलें
छाया आणि सुधारसें घडविली ऐशी रमा सुंदर ?

येतां गाढ निशा, निशाच गमसी कांता भविष्याकृती
तूं मन्मानसशी अगाध शुचिता अज्ञेय ज्योतिष्मती

बोरी १९३७

## यमदर्शन

अकस्मात असें
कळेना कसें
लागतें पिसें
आणि माझ्याच अनंत जन्मांचें भूत
येतें, मालवितें श्वासेंच ज्योती

आणीक सर्वांगीं
भरून कंप
कुदत कुदत भंगीत राहे
स्फटिकचूर्णांची रांगोळी माझी

घर माझें असें
करुनी उजाड
पिळून अष्टांग गाळितें घाम
तेलांत बुडवी काळोख सारा

चडवी ऊर
काढितें गळा
व्याकुळ होऊन
भारितें मला
बोलत शब्द-तुटक वाक्यें.

कळतें कांहीं
लागतें वेड
परका निरर्थ वाटून संसार
माझ्याहि अंगांत संचार होई.

धाताहनि त्याला
लाथाडितों सारें
हिंडतों त्या संगें
होऊनी वारें
जातों उधळून गृहपुत्रदारा
तुडवून आणि पसारा सारा

खांद्यावर त्याच्या
टाकून हात
नशेंत जातों तरून सागर

चढून डोंगर
लंघून दऱ्या
भेदून मेघ
जातों सवेगं
पाहून हंसतों जगाचीं सुखें
जिभा टाकणारीं आशाळ मुखें

वाळूचे किल्ले
कांचेचीं घरें.
आणि मग तेव्हां
अमृतवाणीचे गहन मंत्र

श्रवणीं येती
भारून घेती
पांगळे गाति
पाजळे माति
जळून गात्रें होतात ज्वाळा
तेजात त्यांच्या नाहती स्मृति.

काजळी तमाच्या
कृष्णकमळांत
कृष्णनलि दिसे यमाची मूर्ति

ललाटीं त्याच्या रक्ताची उटी
ज्योतीची शिखा
अग्नीचीं कुंडलें

गळयांत तेजस्वी प्राणांची कंठी
वक्षस्थलीं शुभ्र भस्माचें स्वस्तिक.

मांडींत घेऊन
प्रकाशपुस्तक
अश्रूंच्या शाईनें
लिही जीवात्म्यांच्या असंख्य व्यथांची

अनंत कथा.
आणि त्याच्यावर
सिंचीत राहे
मुक्तात्म्यांची रक्षा
उलटित पान
पालटीत युग
मुखानें म्हणत
अथर्व मंत्र.
दर्शनीं अशा
उमगे मला
विश्वाचें या साऱ्या अद्‌भुत रहस्य.

रहस्य कानडें
सांगतां नये
सर्वांग जाळितां
सर्वांगीं दिसे
पोटांत हंसे
लावुनी पिसें
ज्याविण सारें असूनि नसे
ज्यामुळें सारें नसून असे.

मुंबई २८-७-४८

## माझ्या मनाची 'माउ'ली

माझ्या मनाची 'माउ'ली फिरे वाटोळी वाटोळी
स्वतालाच धरण्याचें तिला वेड तिन्ही काळीं

रोज चुलीची दिवसा उशी राखेची रात्रीला
पीत सर्वांगानें वह्नी जाते स्वप्नांत यात्रेला

वाढणाऱ्या काळोखांत तिचे उजळती डोळे
घर माझें सांभाळाया तिचीं जागतीं पाउलें

करी घुशीउंदरांचा लाल मंगल शेवट
पाजी पोटींच्या वह्नीला खाऱ्या रुधिराचे घट

विष बाधतां त्यांतले अमृताचा घेई शोध
खुडी अंकुरामधोनी निवडून आयुर्वेद

पतंजलीची ही आई घाली योगाचीं आसनें
ओढी अशौचावरोनी शुद्ध भूचीं पांघरुणॆं

तिची रती अगोचर तिचा अज्ञात भ्रतार
तिच्या रसनेंत आहे शुद्ध साष्टांग शृंगार

लक्ष प्रसवांचें आहे तिच्या भोगांत क्रंदन
एका युतींत ती राहे आठ पिलांची गाभण

अग्रपुत्रा धुंडाळिते घरीं काळोखाचा कोन
पिसावते कातावते दिवे विजेचे पाहून

घेते आकसून गात्रें पाहे होऊन व्याकुळ
घाली लावी गळ मला तिच्या मातृत्वाची कळ

दिवे मालवितां सारे शहारतां अंगोपांगीं
रव ऐकून पिलांचे ओलावती अंतरंगीं

फुटावया त्यांना डोळे थांवतों मी कांहीं काळ
तोंच आक्रोश ये तिचा "चाप पोरां झाला काळ"

दिवे लावितां दिसेना, काळोखांत सांपडेना
अशी माझ्या 'माउ'लीच्या होई संसाराची दैना

तरी तशांतून वांचे पोर एकादें दुसरें
मरणाच्या वेदीवर खेळे जीवन हासरें

तिचें यौवन राखाया पोरें खाई का भ्रतार ?
काय एकासाठीं वाहे माय आठांचा हा भार ?

त्याग-भोगाचा हा खेळ कळे परी आकळेना
मात्र सृजनाकारणें अर्थ जीवनामरणा

पुणें १४-१२-४८

## हिमालयाची हांक

श्रवण ये गंभीर हांक कवण सुंदराची
काय गहन असह सह्यशैलगव्हरांची ?

नाभींतुन प्रणव उठे
रोमांतुन कोंभ फुटे
झुळझुळती दरवळती कंपनें स्वरांचीं

ध्यानांतील सिद्ध मुनि
कोरित अनुपम लेणीं
करिति वज्रलेप नर्तनें नटेश्वराचीं

रत्नांचे द्रव स्रवती
स्वाप्निल रस लवलवती
त्यांवरती फुलति गुजें यक्षकिन्नराचीं

डुगडुगतो आदिताल
नाचे कटिबद्ध काल
डमरूंतुनि उपनिषदें घुमति शंकराचीं

वळल्या गंगायमुना
आतुर माहेरपणा
हिमगिरितुन हांक मला परमसागराची
श्रवणिं ये गंभीर हांक भुवनसुंदराची

वेरूळ-अजंठ्याच्या प्रवासांत    १०-११-४८

## चिरंतनाचा ध्यास

आम्हांला चिरंतनाचा ध्यास
महानतेच्या ज्योतिर्जगतीं अखंड अमुचा वास

महानतेस्तव अमुची काया
महानतेस्तव अमुची माया
महान बघतों लहानांतही म्हणुनि तयांचे दास

क्षमा जान्हवी अमुची माता
सत्य प्रभाकर अमुचा जनिता
भ्राते अमुचे समग्र भूतें, घर अमुचें आकाश

दारिद्र्याची अमुची दीक्षा
सत्त्वाची प्रतिपळीं परीक्षा
विपर्यास, छळ, निंदा यांतुनि अमुचा योगाभ्यास

जें जें देवें दिधलें हातीं
खडे, कोळसे अथवा माती
त्यांतुनि त्याच्या स्वप्नमूर्तिंचा घडवूं उदय विकास

संकल्पाचें वरितां कंकण
स्वर्गाचेंहि न अम्हां विलोभन
निर्मू नूतन स्थान दिगंतीं वितरित ध्रुवप्रकाश

ज्या सेवेचा मणी बांधिला
सतिसम जीवन वाहुं त्याजला
ती अपुरी तोंवरि विटेवरि तिष्ठवुं भगवन्तास

अंगिकारिली ज्यांची निष्ठा
त्यांच्यास्तव ठोकरूं प्रतिष्ठा
परलोकाहुनि प्रियतर आम्हां श्वानाचा विश्वास

या जगताची व्यथा हराया
राजमंदिरीं रचूं सराया
स्वयें वरूं वनवास यौवनीं, पुत्रोत्सविं संन्यास

क्रांतिप्रसवा अमुची शांति
श्रद्धेंतच अमुची विश्रांति
विश्व आमुचें शरीर आम्ही त्याचे श्वासोच्छवास

मौनीं अमुच्या मंत्र मुक्तिचे
तपांत अमुच्या सृजन शक्तिचें
कोमल करुणेंतुनी कलांचा दिव्यानंदविलास

जाळा अथवा उटणीं लावा
क्षय वृद्धी ना अमुच्या भावा
चित्त आमुचें नित्य विदेही स्मितमुख आणि उदास

समिधांसम या तनुचीं काष्टें
जाळुनि येथिल हरूं अरिष्टें
निज भस्मांतुन उर्ध्व दिशेंतुन अमुचा पुढें प्रवास

पुणें १९४९

## आळंदीची वाट

झाली भगवी दारापुढची आळंदीची वाट
आली सिंचित मृदुल धुळीवर दहिंवर गार पहांट

खडखड किणकिण ध्वनि गाड्यांचे गमले टाळमृदंग
अंगिं जागले भागवतांचे ओव्या आणि अभंग

किलबिल पक्ष्यांचीही नकळत मिसळत गेली त्यांत
पूर्वेवरचें सोनें वितळत ओघळलें हृदयांत

पुढची भगवद्गीता गमली यज्ञकमल नयनांस
अनुवादांतिल तिन्ही विभूती बसल्या कोंडुनि श्वास

मुनी विनोबा, कवि ज्ञानेश्वर, योगी मोहनदास
त्रिविध त्यांचिया मुद्रामधुनी प्यालों ब्रह्मविलास

धालों, आलों भानावरती समोर निद्रित बाळ
दिसलें, गमलें ब्रह्मसनातन सहजसुलभ वेल्हाळ

करांगुली रवि फिरवित होता त्याच्या कुरळांतून
शांतीवरचें कांचन पाहुन गेलों मी भुरळून

सुकृत फळलें फळलीं माझी आळंदीची वाट
आज अमृतें सहज पाहली माझी सोनपहांट

पुणें                                        २०-११-१९४९

## मला आपुलें म्हणावें

स्नेहें तव जळत प्रभो, उजळतों स्वभावें
हरुनि दुरित सकळ मला आपुलें म्हणावें

भोगांतुनि मथुनि त्याग
त्यागांतुनि कनक-राग
रुधिरांतुनि चिन्मय पय सतत पाझरावें

या मंगल चांदण्यांत
सुख तुजला डुंबण्यांत
उधळित निज रंग निळा त्यांत तूं नहावें

तवपणीं हें माझेपण
वितळुनि हिमसम कणकण
लोचनीं तव होउनि जळ विश्व मीं पहावें

बनुनी आनंद-बिन्दु
आकळूनि विश्वसिन्धु
धुंदींत च दीनबन्धु मीं तुझ्या रहावें

सरुनि सकळ द्वैतपणा
नटवुनि जीवन-मरणा
होउनि निश्वास तुझा नमुनि मी असावें

मुंबई २०-१२-४८

## दे अंतीं तव गोडी

क्षेत्र परम दावुनि नयनां कां घालिसि बेड्या पायीं
विशाल देउनि पंख मनाला कोंडिसि कां या देहीं ?

दरवळ उधळुनि अवतींभवतीं मोडिसि कां उरिं कांटा ?
पळभर उजळुनि काजळिसी कां चिरयात्रेच्या वाटा ?

मागसि कमळें कंद तयांचे ठेवुनियां कां पंकीं ?
विफल तयां मग गणिसी कां रे, पडतां पाय कलंकीं ?

प्राक्तन लिहुनी भाळीं कां रे, खिळविसि डोळे खालीं ?
उमगे तें नच म्हणुनि पुन्हां कां शिक्षा देसि निराळी ?

घनतिमिरीं सोडून घालिसी तेजाच्या कां हांका ?
मरणाच्या जबड्यांत दाविसी कां कनकाची अलका ?

खेळ चालला तुझा परी प्रभु ! जीव चालला माझा
जावो तो परि क्षेम देउनी घेउनि मजला जा जा !

देह उरो उपकारापुरता, पाश सकल हे सोडीं
संसाराच्या कटुतंतुनि परि दे अंतीं तव गोडी !

पुणें — २३-९-४९

## वास्तवता मज न दिसे

पागल मी पागल मी वास्तवता मज न दिसे
वस्तूंचे प्राण मला लाविति दिनरात पिसें

पुष्पांतुनि मोहविती शीतल मज अग्निशिखा
कधिं बाळें देवांची लाविति निज ओठ मुखा

पर्णांतुनि लसलसत्या चमचमती मोरपिसें
खुदखुदतें त्यांतुनि कधिं गोपीचें गोड हंसें

तृण कोमल ये वरती नमवित जधिं खडक चिरे
मरणाला जिंकुनिया श्रद्धा हृदयांत शिरे

दगडादगडामधुनी जळ जेव्हां झुळझुळतें
आईचें हृदय मला सहजपणें उलगडतें

मूकांच्या जखमांतुनि जेव्हां जड रुधिर गळे
वाल्मिकिचें रामायण पढल्याविण मजसि कळे

गरुडजन्म मजसि उषा कृष्णमृत्यु मजसि निशा
रुद्राचें भस्म मला जळणाऱ्या दाहि दिशा

व्यासाच्या प्रणवाचें मंथन मज सिंधुमधें
प्रीतीची जीवकळा मेघाच्या बिंदुमधें

बद्धासन बुद्ध मला क्षितिजांतिल गिरिमधुनी
सूर्यास्तांतुनि दिसते दधिचीची नित्य धुनी

खंडित वृक्षांत उभ्या खिळलेला खिस्त दिसे
' जूडा 'चा दंश मला मृत्यूहुनि खोल डसे

भोगविलासांत दिसे कलिची मज रक्तपिती
अप्सरेंत मी बघतों जळणाऱ्या लक्ष सती

भिक्षेच्या करटींतुनि भस्मासुर भिववि मला
मी रडतों, ओरडतों, ' उघड तिळा, उघड तिळा '

ऐकेना परि कोणी अग्नि उरीं धडधडतो
ज्वांलापरि मी निरर्थ ह्या अनर्थ बडबडतों

शापित मी शासित मी वास्तवता मज न दिसे
वस्तूंतुन ठेचाळत धुंदित मज हिंडतसें

पुणें          ३-१२-४९

## उःशाप

करूं नकोस विलाप हृदया, करूं नकोस विलाप
वरासवें रे तुझ्या कपाळीं एक भयंकर शाप

जगांत इथल्या तूं परदेशी
तुझें वागणें इथें विदेशी
जे जे निर्मल भाव शिंपिशी त्यांतुनि उगवे पाप

असेल गतजन्मींचें संचित
जिथें तिथें तुज करीत वंचित
परी कांचना ही जनगंगा संजीवक तेजाप

कवण ग्रहाची भीषण छाया
अथवा मायाविनिची माया
मधांतुनी विष पाजित अनुदिन घडवितसे अनुताप

अशीच आपण शिकूं विरक्ति
निराभिलाष करुं जीवनभक्ति
लाथाडुनि मग जाऊं अंतीं ऐहिकतेचें माप

मरण न कधिं हृन्मांगल्याला
असंख्य फुटतिल कोंभ तयाला
मृत्यूनंतर शतवर्षांनीं मिळेल तुज उःशाप

मुंबई २४-८-४८

२११३१ ९३४८ क्रमांक..... दि.३०.११.५

## 'जीवन' त्यांना कळलें हो

जीवन त्यांना कळलें हो
मीपण ज्यांचे पक्क फळापरि
सहजपणानें गळलें हो

जळापरी मन निर्मळ ज्यांचें
गेलें तेथें मिळलें हो
चराचराचें होउनि जीवन
स्नेहासम पाजळलें हो

सिंधूसम हृदयांत जयांच्या
रस सगळे आकळले हो
आपत्कालीं अन् दीनांवर
घन होउनि जे वळले हो

दुरित जयांच्या दर्शनमात्रें
मोहित होउनि जळलें हो
पुण्य जयांच्या उजवाडानें
फुललें अन् परिमळलें हो

आत्मदळानें नक्षत्रांचें
वैभव ज्यांनीं तुळिलें हो
सायासाविण ब्रह्मसनातन
घरींच ज्यां आढळलें हो
--उरींच ज्यां आढळलें हो

मुंबई १७-९-४७

## अजून थोडें सोस मना

रे अजून थोडें सोस मना

जळल्यावांचुन नाहीं ज्योती
कढल्यावांचुन नाहीं मोती
रडल्यावांचुन नाहीं प्रीती
नच घणांवांचुनी देवपणा

प्रसववेदनांविण ना सृष्टी
तपनावांचुनि नाहीं वृष्टी
दुःखाविण ना जीवनदृष्टी
मेल्याविण मिळला स्वर्ग कुणा

क्षुधेविणें रसनेंत न गोडी
छलनाविण ना सुकृत-जोडी
उरिं फुटल्याविण सुटति न कोडीं
रस नसे यातनेविण कवना

दातांनीं जरि जीभ चाविली
कुणी बत्तिशी सांग तोडिली
सगळी ही अपुलीच मंडळी
मग शब्द कशाला उणादुणा ?

घरटें तुटतां खुलें दिगंतर
मोह संपतां आप्त चराचर
सोससोसतां सासर हो घर
अद्भुत यापरि हरिची करुणा

पुणें

ता. २२-५-५०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्र. २१९३१ विषय काव्य
क्रमांक १३४८ नोंद दि. ३.११.११.५९

## ये संध्ये जा कथुनी

ये संध्ये जा कथुनी
यामिनिचें गुज गहिरें

छायांच्या रायांतिल
उलगडुनी मधुर झरे

येइं जरे उरले किति
दिन माझे सांगुन जा

मृत्यूच्या कलशांतिल
जल शीतल पाजुन जा

अन् कविते ! निद्रेपरि
शामक गा कांहितरी

हेलावित नेइं मला
जागृतिच्या पैलतिरीं

घरट्यांतुनि अवकाशीं
नकळत मज घेउनि जा

श्वसनासम सहज मला
आश्वासन देउनि जा

अन् भंवतीं तम चढतां
कनकाचा लाव दिवा

विझतां हृदयांत धूप
फुलवीं अंगार नवा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| ६ | ५ | कुरवळीं | कुरवाळी |
| २० | १५ | २३–२–२८ | २३–२–४८ |
| २१ | १२ | घेईन | घेइन |
| ,, | १५ | तरीं | तरि |
| २४ | ९ | आतां | अतां |
| २८ | १० | घेईल | घेइल |
| ३२ | १६ | गृहतांपातुन | गृहतापांतुन |
| ,, | २१ | निज इथें | इथें निज |
| ३७ | १ | उरीं ! | उरीं |
| ३९ | २ | भंग्या घरिं | भंग्यां घरिं |
| ४५ | ५ | चिवडिते | निवडिते |
| ७२ | २० | पिटवा | मिटवा |
| ७३ | २ | सुरलें | सुरले |
| ,, | १० | त्याहुनि | त्याहून |
| ७६ | ९ | तुझ्या | तुक्या |
| ७७ | १६ | भाजला | भाजला गे |
| ,, | २३ | १०–९–५० | १०–९–४० |
| ७९ | ३ | नकलुनि ही | नकलुनिही |
| ८० | ५ | भासतीं | भाससी |
| ,, | १० | अश्रुहि | अश्रुही |

| | | | |
|---|---|---|---|
| ८१ | ४ | कंठी | कंठीं |
| ८२ | १५ | आरवाग | आरवाग |
| ८९ | ५ | आहे | वाहे |
| ,, | १२ | ओलावती | ओलावतीं |
| ९० | २ | श्रवण ये गंभीर | श्रवणिं ये गभीर |
| ,, | ६ | ध्यानांतील | ध्यानांतिल |
| ,, | १३ | कटिबद्व | कटिबद्ध |
| ९२ | ६ | तोंवरि | तोंवरी |
| ९३ | १५ | फळलीं | फळली |
| ९४ | ११ | लोचनीं | लोचनिं |
| ,, | १७ | निश्वास | निःश्वास |
| ९६ | ४ | तिज | निज |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्र. 29739 वि कोश
9384 नों. दि. 30.7.84
REFBK-0007480
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# बोरकर–वाङ्मय

कवितासंग्रह

- प्रतिभा
- जीवनसंगीत
- दूधसागर
- आनंदभैरवी

कादंबऱ्या—

- मावळता चंद्र
- अंधारांतील वाट
- भावीण

लघुनिबंध—

- कागदी होड्या

अनुवादित—

- जळतें रहस्य
- बापूजींचीं ओझरतीं दर्शनें
- आम्हीं पाहिलेलें ग[redacted]जी

# झ्वाइगच्या कथा

स्टीफन् झ्वाइगच्या सिद्धहस्त कलमांतून उतरलेल्या कलात्मक दीर्घकथांचा रसपूर्ण अनुवाद

: अनुवादक :

वा. भ. बोरकर

( छापत आहे. )